थोडे परि निरे। अविट ते घ्यावे खरे ॥
घ्यावे जेणे नये तुटी। बीज वाढे बीजा पोटी ॥

# क्रांतिअग्रणी पर्व

प्रबोधन । संघटन । संघर्षासाठी | पाक्षिक | सोमवार, २७ जुलै २०२६





# प्रश्न विचारणारी पिढी




संस्थापक
**स्व. क्रांतिअग्रणी डॉ. जी. डी. बापू लाड**

संपादक मंडळ अध्यक्ष
**आ. अरुण लाड**
सदस्य, विधानपरिषद, महाराष्ट्र राज्य

संपादक : **अशोक पांडूरंग पवार**
मु. पो. कुंडल, मो. ९८२२३५६४३०

प्रकाशक : **उमेश दत्तात्रय पेटकर**
मु.पो. कुंडल, ता. पलूस, जि. सांगली.

मालक : **अशोक पांडूरंग पवार**
मु.पो. कुंडल, ता. पलूस, जि. सांगली.

मुद्रक : **लक्ष्मी प्रिंटिंग प्रेस, कुंडल**
प्रोप्रा. गोविंद किसन डुबल

संपादन, मांडणी : **संस्कृती-पृथ्वी क्रिएशन, सांगली**
मोहन यादव - प्रशांत देसाई
८८०५००७४१६ - ९८५०९७७५०९

**RNI No.: MAHMAR/2008/24954**
**RND/53/KRANTIAGRANIPARV/2025**
**SGL/53/2025-2027**

- वर्ष : १८ वे • अंक : ४३
- सोमवार, दि. २७ जुलै २०२६
- पृष्ठे ३२ • मूल्य : ₹२०
- वार्षिक वर्गणी : ₹५००
- कार्यालयीन पत्ता:
  संपादक, 'क्रांतिअग्रणी पर्व' पाक्षिक
  मु.पो. कुंडल - ४१६ ३०९,
  ता. पलूस, जि. सांगली (महाराष्ट्र)
- email : krantiagrani@gmail.com



या अंकात प्रसिद्ध झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (पलूस न्याय कक्षेत)


# अंतरंग


- 'क्लास माफियां'चे करायचे काय? ४
- विद्यार्थी तरुणांचे अभिनंदन आणि आभार! ७
- 'जेन झी'ने चिंधड्या उडवल्या... ९
- मुलांच्या विचारांवर ताबा कोणाचा? १०
- एक दिवस स्त्रिया संपावर गेल्या तर... १२
- नात्यातला 'ब्रेकिंग पॉइंट' १३
- हायड्रोजन ट्रेन : ग्रीन फ्युचरसाठी धडपड? १४
- ग्राफिक्स १६
- विठोबा मिसिंग इन पंढरपूर... १८
- 'लॉ ऑफ अट्रॅक्शन' चा भ्रामक खेळ २०
- जस्ट जोकिंग २२
- पीअर प्रेशर आणि टीनएजर्स २४
- तणनाशकाचा योग्य वापर २६
- फवारणीमुळे वाढेल भूईमुगाचे उत्पन्न २८
- वीज बिले माफ करा..... ३०

संपादकीय

# संवेदनशील 'जेन झी'

समाजाच्या इतिहासात काही पिढ्या केवळ काळाचा भाग म्हणून ओळखल्या जात नाहीत; त्या परिवर्तनाची दिशा ठरवतात. आजची जनरेशन Z अशीच एक पिढी आहे. तिच्या हातात तंत्रज्ञान आहे, डोळ्यांत स्वप्ने आहेत आणि मनात प्रश्न आहेत. या पिढीचे वैशिष्ट्य म्हणजे ती प्रश्न विचारते, उत्तरांची अपेक्षा ठेवते आणि त्यासाठी लोकशाहीच्या मार्गाने उभी राहते. अलीकडील विद्यार्थी आंदोलनांनी ही बाब पुन्हा अधोरेखित केली आहे.

विद्यार्थ्यांच्या आंदोलनांकडे केवळ विरोध किंवा घोषणाबाजी म्हणून पाहण्याची सवय समाजाला लागली आहे. मात्र यावेळी चित्र वेगळे दिसते. विविध पार्श्वभूमीतील विद्यार्थी एका समान प्रश्नासाठी एकत्र आले आहेत. त्यांच्या हातात कोणत्याही पक्षाचा झेंडा नाही, तर न्याय्य मागण्यांची यादी आहे. त्यांना कोणत्याही नेत्याची अंधभक्ती नको आहे; त्यांच्या प्रश्नांना समजून घेऊन त्यावर ठोस निर्णय घेणारे शासन हवे आहे. लोकशाहीच्या दृष्टीने ही सकारात्मक बाब आहे. लोकशाहीत सरकार कोणत्या पक्षाचे आहे, यापेक्षा ते जनतेपुढे किती उत्तरदायी आहे, हे अधिक महत्त्वाचे असते. सत्ताधारी बदलत राहतात; मात्र नागरिकांच्या अपेक्षा कायम असतात. एखादा नेता आवडतो म्हणून त्याच्या प्रत्येक भूमिकेचे समर्थन करणे किंवा पक्षनिष्ठेपोटी प्रत्येक निर्णय योग्य ठरवणे ही लोकशाहीची निरोगी पद्धत नाही. विवेकाने प्रश्न विचारणे आणि योग्य निर्णयाची अपेक्षा ठेवणे हीच सजग नागरिकाची ओळख आहे.

विद्यार्थी आंदोलनांकडे केवळ असंतोष म्हणून न पाहता, समाजातील बदलत्या विचारांचे प्रतिबिंब म्हणून पाहण्याची गरज आहे. या आंदोलनांचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे त्यामध्ये दिसणारी समानतेची भावना. सामाजिक माध्यमांवर अनेकदा टोकाचे मतभेद आणि वैचारिक संघर्ष दिसतात; परंतु अनेक विद्यार्थी परस्पर आदर, सहकार्य आणि संवादाचा मार्ग स्वीकारताना दिसतात. स्त्री-पुरुष समानता ही संघर्षाची नव्हे, तर परस्पर सन्मानाची बाब आहे, ही जाणीव त्यांच्यात स्पष्टपणे दिसते. व्यक्तीची ओळख तिच्या लिंगाने नव्हे, तर विचारांनी आणि कृतीने ठरते, हा दृष्टिकोन समाजासाठी निश्चितच स्वागतार्ह आहे.

कोणतेही आंदोलन यशस्वी होईलच, असे नाही. काही आंदोलनांना तात्काळ यश मिळते, तर काही काळाच्या ओघात विरून जातात. मात्र प्रत्येक आंदोलन समाजाला विचार करायला भाग पाडते. आजची विद्यार्थी चळवळही तेच करत आहे. ती शासनालाच नव्हे, तर पालक, शिक्षक आणि समाजालाही एक महत्त्वाचा प्रश्न विचारत आहे -आपण आपल्या तरुण पिढीला स्वतंत्र विचार करण्याचे स्वातंत्र्य खरोखर दिले आहे का? आज प्रत्येक घरात जनरेशन Z आहे. या पिढीची मते आपल्या मतांपेक्षा वेगळी असू शकतात; पण म्हणून ती चुकीची असतीलच असे नाही. त्यांच्या प्रत्येक मताशी सहमत असणे आवश्यक नाही, परंतु त्यांचे विचार ऐकून घेणे, त्यांचा आदर करणे आणि संवादातून योग्य दिशा देणे ही प्रत्येक पालकाची जबाबदारी आहे. मतभिन्नतेचा स्वीकार हा लोकशाही संस्कृतीचा पाया आहे.

पूर्वी आयुष्याचा मोठा अनुभव घेतल्यानंतर जी सामाजिक आणि राजकीय समज विकसित होत असे, ती आज अनेक तरुणांमध्ये वयाच्या विशीतच दिसून येते. माहितीचा वेग, जागतिक घडामोडींचा परिचय आणि डिजिटल युगातील संवाद यामुळे त्यांची विचारशक्ती अधिक व्यापक झाली आहे.

जनरेशन Z ही केवळ डिजिटल युगातील पिढी नाही; ती लोकशाही, समानता आणि विवेक यांवर विश्वास ठेवणारी पिढी आहे. तिच्या प्रत्येक भूमिकेशी सहमत असण्याची गरज नाही; पण तिचे प्रश्न दुर्लक्षित करणे समाजासाठी हिताचे ठरणार नाही. कारण आज प्रश्न विचारणारी ही तरुणाईच उद्याचा अधिक जबाबदार, संवेदनशील आणि लोकशाहीवादी भारत घडविण्याची क्षमता बाळगून आहे.



# 'क्लास माफियां'चे करायचे काय?

**NEET व इतर परीक्षा प्रक्रियेत सतत होत असलेल्या घोटाळ्यांतून आणि दहावी, बारावी व पदवी या स्तरांवरील अभ्यासक्रमाचा दर्जा, त्यांच्या परीक्षा आणि त्यातील गैरप्रकार यांतून एक गोष्ट प्रकर्षानं समोर येत आहे. ती म्हणजे सध्याच्या शिक्षणव्यवस्थेवर, परीक्षा पद्धतीवर अतिशय गांभीर्यानं विचार करण्याची आणि त्यामध्ये आमूलाग्र बदल करण्याची वेळ आलेली आहे.**

**प्रा. डॉ. संजय करंडे,** बार्शी

पहिली गोष्ट म्हणजे NEET, JEE, CET यांसारख्या परीक्षांमुळे खासगी कोचिंग क्लासेसचा सुळसुळाट झाला आहे. या कोचिंग क्लासेसच्या जाहिराती व तीव्र स्पर्धेमुळे समाजात असे वातावरण तयार झाले आहे की, आपण क्लासेसशिवाय या परीक्षा पासच होऊ शकत नाही. त्यातून एक 'स्टेटस सिम्बॉल' तयार केला गेला आहे. अनेक क्लासेसची तर देशपातळीवर प्रसिद्धी झाली आहे. त्यांच्या अनेक मोठ्या शहरांत शाखा उघडण्यात आलेल्या आहेत. त्यांच्या स्पर्धेतून 'क्लास माफिया' आणि त्यांचे अंतर्गत टोळीयुद्धात रूपांतर झाल्याचेदेखील काही ठिकाणी निदर्शनास येत आहे.

या 'क्लास माफियां'कडे अमाप पैसा निर्माण झाला आहे. त्यामुळे शासन यंत्रणांना आपलंसं करण्याइतकं भागभांडवल आणि राजकीय वरदहस्त या मंडळींकडे उपलब्ध नाही झाला तरच नवल. यातून एक भयानक वास्तव तयार झालं आहे. ते म्हणजे महाविद्यालयांना समांतर, किंबहुना त्याहीपेक्षा दांडगी व्यवस्था निर्माण झाली आहे. विशेष म्हणजे ती सर्व मार्गानं पोसली जात आहे.

प्रसारमाध्यमांना वर्षभर जाहिराती पुरवण्याचं सामर्थ्यही यांच्याकडे आहे. सत्ता आणि प्रसारमाध्यमं यांना वश केल्यानंतर, NTAसारख्या संस्थांच्या काही निवडक अधिकार पदावरील नेमणुकांवर ते प्रभाव टाकू शकणार

नाहीत, असं वाटणं हा एक तर आपला भोळेपणा तरी आहे किंवा कदाचित शासनकर्ता हा देव असतो, असं मानण्याचा देवभोळेपणा तरी.

दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे खासगी क्लासेसची मक्तेदारी तयार कशी झाली ?, ती जाणीवपूर्वक काही स्वार्थी राजकीय नेत्यांनी आणि खासगी धनदांडग्यांनी मिळून तयार केलेली आहे, हे वास्तव पण समजून घेतलं पाहिजे. दहावी-बारावी बोर्ड परीक्षांचं बदललेलं स्वरूप, त्यातील भेद नीट समजून घेतल्यास सत्य लक्षात येण्यास मदत होईल. आपण NEET परीक्षेवर चर्चा करत असल्यामुळे माझा भर बारावी विज्ञान शाखेवर आहे.

NEET, JEE व CET सारख्या परीक्षांची निर्मिती का झाली, तर बारावी बोर्ड परीक्षा, त्यातील पेपरफुटी आणि त्यातील अनियमितता वगैरेमुळे. याचा विचार करून एक महाभयंकर परंतू काहींच्या अत्यंत फायद्याचा पर्याय पुढे करण्यात आला, तो म्हणजे CET, NEET. आणि इथूनच पुढचं 'गौडबंगाल' सुरू झालं. यातून केवळ भ्रष्टाचारच वाढला असं नाही, तर आर्थिक उलाढाल आणि पालक-विद्यार्थी यांचे हालदेखील वाढले.

यातून सर्वसामान्यांच्या शिक्षणाला सुरुंग लावला गेला. महाविद्यालयांची अवस्था लयाला जाण्यास सुरुवात झाली. महाविद्यालयातील वर्ग, प्रयोगशाळा विद्यार्थ्यांनी खचाखच भरायच्या, त्या आता ओस पडतान दिसत आहेत. कारण बोर्ड परीक्षेच्या स्वरूपाने स्पर्धात्मक परीक्षांच्या स्वरूपापासून फारकत घेतली किंवा धोरणकर्त्यांनी त्यामध्ये मुद्दामहून गॅप ठेवली. परिणामी महाविद्यालयातील शिक्षण एका दिशेनं, तर परीक्षा दुसऱ्या दिशेनं जायला लागल्या. मग पालक आणि शिक्षक यांनी आपला मोर्चा अमाप खर्च करून खासगी क्लासेसकडे वळवला.

बोर्ड परीक्षेचे महत्त्व कमी करून अशा परीक्षांचं महत्त्व वाढवलं गेलं. जोपर्यंत १२ वी बोर्ड परीक्षेच्या गुणवत्तेवर प्रवेश सुरू होते, तोवर स्थानिक कोचिंग क्लासेस नव्हते असं नाही, पण त्यासोबत महाविद्यालयातील प्रात्यक्षिकंदेखील तेवढीच महत्त्वाची मानली जात. त्यामुळे विद्यार्थी दोन्ही ठिकाणी उपस्थिती लावत. हे स्वरूप NEET च्या आगमनानंतर बदलून गेलं.

विद्यार्थी केवळ नावालाच महाविद्यालयात प्रवेश घेऊ लागले. त्यातून विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित, स्वयं-अर्थसहाय्यित असे वेगवेगळे वर्ग तुकड्यांचे प्रकार अस्तित्वात आले. पैशासाठी हपापलेल्या लोकांनी खासगी महाविद्यालयीन तुकड्या सुरू केल्या. केवळ 'आमच्याकडे प्रवेश घ्या, आम्ही पासिंगची हमी देतो' असे सर्वपरिचित स्वरूप अस्तित्वात आले.

अशा प्रकारे 'नॉमिनल ॲडमिशन' घेऊन, हे विद्यार्थी खासगी कोचिंग क्लासेसला प्रवेश घेऊ लागले. वर्षानुवर्षं अतिशय चांगल्या पद्धतीनं चालत असलेली महाविद्यालयं या गोरखधंद्यापासून दूर राहिल्यामुळे ओस पडायला सुरुवात झाली. त्यांच्या गुणवत्तेवर इतिहासाच्या आधारे मूल्यमापन

## नेमका जाब कुणाला विचारावा

**फार्मसी, इंजिनिअरिंग यांच्या परीक्षासुद्धा आत्ता कुणीही वाय. डी. पडणार नाही, अशाच वातावरणात पार पडतात. पदवी परीक्षेची भरारी पथके फक्त उंच आकाशातून भरारी मारून निघून जातात. विद्यापीठीय परीक्षेतील अंतर्गत, बहिस्थ परीक्षक आपलेपणानं व अगदी जिव्हाळ्यानं परीक्षा घेतात. एखाद्यावर कारवाई करायची वेळच आली, तर तो विद्यार्थी कोणत्या तरी विद्यार्थी संघटनेचा सदस्य असतो किंवा नगरसेवक, आमदार, खासदार यांचा कार्यकर्ता निघतो. दबाव टाकला जातो आणि सर्व प्रकारच्या परीक्षा पार पाडतात. असे वाटते की, आपण या सर्व गोष्टीवर बोलण्याचा नैतिक अधिकार हरवून बसलेली शिक्षक, विद्यार्थी आणि पालक यांची नवी पिढी निर्माण केली आहे की काय ? त्या पिढीला नेमका जाब कुणाला विचारावा, हेदेखील कळत नाही. खासगी क्लासेसच्या समोर लोक आंदोलन करत आहेत. तथाकथित क्लास संचालक यांची पोस्टर फाडली जात आहेत, त्यांच्यावर काळे फासले जात आहे. परंतू NTA, NEET चे अध्यक्ष, शिक्षणमंत्री यांच्या बाबतीत कुणीही काहीही बोलताना दिसत नाही.**



## परीक्षाही झाल्या भ्रष्ट...

**ग्रामीण भागातील परीक्षा केंद्रांवर दहावी, बारावी परीक्षा कशा होतात हे सर्वश्रुत आहे. पदवी परीक्षांची अवस्थादेखील थोड्या फार प्रमाणात तशीच आहे. मुक्त विद्यापीठाच्या परीक्षा नावाप्रमाणेच 'मुक्त' वातारणात पार पडतात, हे वास्तव आपण पाहणार आहोत की नाही ? एक 'भ्रष्ट संस्कृती' तयार करून आपण कोणत्या प्रकारचे शैक्षणिक वातावरण तयार करत आहोत ? कोणती शैक्षणिक मूल्ये रुजवत आहोत ? यावर विचार होणार आहे की नाही ? प्रात्यक्षिक परीक्षा, तोंडी परीक्षा यांचे गुणदान कसे होते, हे सांगायची गरज आहे का ? भ्रष्ट मानसिकता प्रारंभीपासूनच तयार होत असेल, तर त्यावर आपण काही उपाययोजना करणार आहोत की नाही ? शिक्षणाचे क्षेत्र पूर्वी भ्रष्टाचारमुक्त मानले जात होते, पण आज विद्यार्थ्यांना परीक्षेत काहीही नाही बोलला, तरी तोंडी परीक्षेला पैकीच्या पैकी मार्क मिळतात. ७५ टक्के हजेरी नाही भरली, तरीही परीक्षेला बसता येते. विद्यार्थी कोचिंग क्लासला उपस्थित राहिला, तरीही त्याला हजेरीवर मात्र शिष्यवृत्ती मिळते.**

करून प्रश्न उपस्थित केले जाऊ लागले आणि त्यांची गुणवत्ता ढासळल्याचे आरोप व्हायला लागले. अकरावी-बारावीच्या स्तरावर हे खासगी कोचिंग क्लासेसची आणि अशा पैशाच्या पाठीमागे धावत असलेल्या विनाअनुदानित व स्वयं-अर्थसहाय्यित महाविद्यालयांची चलती सुरू झाली. मग उच्च व तंत्र शिक्षणाचे स्वरूपदेखील तशाच प्रकारे तयार करण्यात आले. मेडिकल आणि पॅरामेडिकल कोर्सेस, इंजिनिअरिंग आणि संगणक प्रणालीशी निगडित विनाअनुदानित महाविद्यालयं, यांना भरमसाठ प्रमाणात मान्यता देण्यात आल्या.

मग अशा महाविद्यालयांना विद्यार्थीरूपी 'ग्राहकां'ची गरज पडायला लागली. सत्तेतील पैशाचे दास इमानेइतबारे धनदांडग्यांच्या ग्राहक-गरजा पुरवण्यासाठी धोरणात्मक बदल करण्यासाठी सज्ज झाले. विज्ञान शाखेला प्रवेश वाढले, तरच यांना गिऱ्हाईक मिळणार होते, हे उघड सत्य होते. मग कशा पद्धतीने विज्ञान शाखेला विद्यार्थी वाढतील, याचा विचार करून अभ्यासक्रम धोरण आखले गेले. बारावी कला, विज्ञान आणि वाणिज्य या तिन्ही शाखा समपातळीवर असताना बोर्डाने त्यांची परीक्षा पद्धती समान पातळीवर ठेवली, पण गुणप्रणाली आणि उत्तीर्ण होण्याचे नियम मात्र वेगवेगळे केले.

विज्ञान शाखेला वेगळा न्याय देण्यात आला. का? यांत नेमके कोणाचे हित डोळ्यासमोर ठेवण्यात आले? वाणिज्य शाखेचा पेपर ८० मार्क लेखी व २० मार्क प्रात्यक्षिक अथवा तोंडी असा असतो, तेच स्वरूप कला शाखेतील विद्यार्थ्यांनादेखील लागू पडते, पण विज्ञान शाखेसाठी मात्र हे स्वरूप बदलण्यात आले. त्याचे ७० मार्क लेखी व ३० मार्क प्रात्यक्षिक परीक्षा असे स्वरूप करण्यात आले. याचा एकूण शिक्षण प्रणालीवर आणि विशेषतः उच्च माध्यमिक पातळीवरील प्रवेश प्रक्रियेवर मोठा परिणाम झाल्याचे जाणवते. यामुळे तिन्ही शाखांच्या प्रवेश संख्येमध्ये असमतोल निर्माण झाला. हा असमतोल नैसर्गिक नाही, तर धोरणकर्त्यांच्या व खासगी धनदांडग्यांच्या अनैसर्गिक युतीतून कृत्रिमरित्या तयार झालेला आहे, हे आपण नीट समजून घेतले पाहिजे. या स्वरूपामुळे एकूण शिक्षणप्रणालीच पूर्णतः बदलून गेली आहे. या ७०+३० च्या स्वरूपामुळे पारंपरिक शिक्षणाचा ढाचा मोडकळीस निघायला लागला आहे.

# विद्यार्थी तरुणांचे अभिनंदन आणि आभार!

**समाजभान**




**विद्यार्थी तरुणांचे अभिनंदन आणि आभार! कारण देशातील शिक्षण क्षेत्राचा ज्वलंत विषय, गेली अनेक वर्ष चिखलात रुतून बसलेला होता, त्याचा गाडा किमान अंशतः का होईना, बाहेर काढल्याबद्दल... देशातील खऱ्याखोट्या अस्मिताकेंद्री प्रश्नांपेक्षा, राजकीय अर्थव्यवस्थेच्या गाभ्यातील खऱ्या खऱ्या प्रश्नांना पुन्हा अजेंड्यावर आणल्याबद्दल...**

**संजीव चांदोरकर,** ज्येष्ठ विचारवंत, पुणे

गेले काही दिवस देशातील विद्यार्थी, तरुणांचे विश्व काही घडामोडींनी ढवळून निघाले आहे. जरी मीडियाने ठरवून त्याची दखल घेतली नसली तरीही, या विद्यार्थी तरुणांनी "चलो संसद" चा नारा देत मोर्चा काढण्याचे जाहीर केले. त्या आवाहनाला अपेक्षेपेक्षा प्रचंड प्रतिसाद मिळाला. दिल्ली शिवाय देशातील अनेकानेक शहरात आंदोलने, धरणे जाहीर सभा असे कार्यक्रम घेतले गेले. या सर्व कार्यक्रमात सहभागी झालेल्यांची एकत्रित संख्या काही लाख असू शकते. फार पूर्वतयारी नाही. साधनसामुग्री नाही. तरीदेखील हे घडले! अनेक अर्थाने ही खूप मोठी आणि विश्वास देणारी घटना आहे.

दिल्लीतील जंतरमंतरवरीलच नाही तर देशातील विद्यार्थी तरुणांचा उत्स्फूर्त प्रतिसाद हेच सांगत आहे, की देशातील विद्यार्थी आणि तरुण, त्यांच्या जीवनाची, भवितव्याची जी काही हेळसांड सुरू आहे, त्यामुळे प्रचंड अस्वस्थ आहेत. त्यासाठी ते सोशल मीडियाच्या बाहेर येऊन रस्त्यावर उतरण्यास तयार आहेत. शासनाच्या दादागिरीला सामोरे जाण्यास तयार आहेत. हा मेसेज गेल्या दोन अडीच महिन्यात धिम्या गतीने उभ्या राहिलेल्या आंदोलनाचा निचोड आहे. संपूर्ण आंदोलनबद्दल माझी देखील क्रिटिकल मते होती, आहेत. पण मनात कोणताही किंतू न बाळगता घडलेल्या प्रक्रियेचे स्वागत केले पाहिजे.

सोशल मीडियावरील निषेधाचे ट्विटर स्टॉर्म नवीन नाहीत. ती वादळे उठतात आणि शमतात देखील. पण यावेळी तरुण सोशल मीडियावर निषेध नोंदवून थांबले नाहीत. अभिजीत दीपके यांनी पुढाकार घेऊन कॉकरोच जनता पार्टी स्थापन केली. दिल्लीत जंतरमंतरवर धरणे आंदोलन कार्यक्रम घोषित केला. त्यानंतर त्या आंदोलनात सोनम वांगचूक यांनी सहभाग घेण्याचे जाहीर केले आणि आंदोलनाचा कार्यक्रम वेगळ्या उंचीवर गेला. जंतर-मंतरवर वांगचूक यांनी आमरण उपोषण आरंभले. त्यात डाव्या आणि आंबेडकरवादी पक्ष संघटनाच्या विद्यार्थी तरुणांच्या संघटना सामील झाल्या. त्या संघटनातील अनेक विद्यार्थी विद्यार्थिनींनी वांगचूक यांच्या बरोबर उपोषणात बसून जिवाची बाजी लावली.

देशाप्रती/ समाजाप्रती काहीएक बांधिलकी मानणाऱ्या निवडक साहित्यिक, पत्रकार, कलावंतांनी प्रत्यक्ष जाऊन, किंवा विविध व्यासपीठांवरून पाठिंबा दिला. भाजप व्यतिरिक्त जवळपास देशातील प्रत्येक राजकीय पक्षांनी पाठिंबा दिला. या सर्वांनी राजकीय परिपक्वता दाखवली आहे. कोणत्याही



देशासाठी शिक्षण क्षेत्राचे स्थान आणि महत्व एकमेवद्वितीय आहे, व्यक्तिगत, कौटुंबिक, सामाजिक, आर्थिक, राजकीय कोणत्याही दृष्टिकोनातून बघितले तरी. कारण त्यातून देशाचे, समाजाचे, अर्थव्यवस्थेचे भवितव्य ठरत असते. धिम्या गतीने उलगडत जाणारी दीर्घकालीन प्रक्रिया आहे ही.

ऑल इंडिया सर्व्हे ऑन हायर एज्युकेशननुसार देशात आजच्या घडीला साडेचार कोटी मुले-मुली उच्च शिक्षण घेत आहेत. त्यात देशातील बॉटम ऑफ पिरॅमिडमधील कुटुंबातून येणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण सतत वाढते आहे. हा आकडा हृदयात स्वप्ने आणि आकांक्षा घेऊन प्रौढ होणाऱ्या तरुणांचा आकडा आहे. त्यात दरवर्षी घट न होता तो वाढतच आहे. हे आंदोलन जरी उच्च शिक्षण घेणाऱ्या , स्पर्धा परीक्षांना बसणाऱ्या विद्यार्थ्यांनी सुरु केले असले तरी त्या निमित्ताने एकूणच शिक्षण क्षेत्राचे जे अनेक गंभीर प्रश्न आहेत ते ऐरणीवर आले पाहिजेत. अनेक वर्षांच्या दुर्लक्षामुळे त्याचा बॅकलॉग प्रचंड आहे. मोठी यादी करता येईल.

दोन अडीच महिन्यानंतर हे आंदोलन नक्कीच एका मैलाच्या दगडावर आले आहे. हे असेच एका सरळ रेषेत सुरु राहू शकणार नाही हे उघड आहे. पण यातून संपूर्ण देशात जी ढवळणूक झाली आहे, त्यातून जी ऊर्जा तयार झाली आहे, विद्यार्थी , तरुणांमध्ये जी जागृती तयार झाली आहे ती खूप मोलाची आहे. कारण हेच विद्यार्थी-तरुण या शतकातील भारत आहेत. कोणीही त्यांना सब्स्टीट्युट नाही.

## संबंध रोजगार-बेरोजगारीशी

**देशाच्या जीडीपीच्या किमान सहा टक्के शिक्षण क्षेत्रावर खर्च व्हावेत असा नॉर्म असताना दरवर्षी दोन-तीन टक्क्यांपेक्षा जास्त खर्च होत नाही. फक्त एक टक्का वाढ केली तरी तीन लाख कोटी रुपये उपलब्ध होऊ शकतात. देशात फक्त गेल्या दहा वर्षात एक लाख शाळा बंद पडल्या आहेत. शिक्षण क्षेत्राचे लाज वाटावी एवढे व्यापारीकरण केले गेले आहे. शिक्षण काही एन्ड इन इटसेल्फ नाही, नसले पाहिजे. त्याचा संबंध रोजगार-बेरोजगारीशी आहे. देशात दरवर्षी १४० लाख तरुण रोजगार क्षेत्रात नव्याने भरती होत असतात. आणि रोजगार जेमतेम २० ते ३० लाख तयार होतात.**

ती ऊर्जा देशातील एकूणच शिक्षण क्षेत्र अधिक विद्यार्थी केंद्री होण्यासाठी, शासनाला सर्वार्थाने अधिक जाबदायी बनवण्यासाठी कामी येईल अशी आशा आहे.

# 'जेन झी'ने चिंधड्या उडवल्या...

**अमूक शब्द बोलायचे नाहीत, तमूक पद्धतीने बोलायचे नाही, भिऊन दबकून राहायचं या गोष्टींना या पिढीने एका आठवड्यात सुरुंग लावलाय! हे शब्द अश्लील आहेत, अर्वाच्य आहेत असं मागच्या सगळ्या पिढ्या मानत होत्या; वास्तवात ह्या शब्दांना लाजवेल असे व्यभिचार छुप्या पद्धतीने चालत असतात, त्यावर मात्र कथित सभ्य पिढ्या मौन होत्या. जे काही करायचेय, बोलायचेय ते झाकून लपून - छपून करा, असा एक भेकडनीतीचा फंडा राबवला जाई! जेन झीने त्याच्या पार चिंधड्या उडवल्या!**

---

**मोहन यादव,**
वरिष्ठ पत्रकार, सांगली-कोल्हापूर

**चळवळ**




'जेन झी'च्या फलकांची भाषा, या आधीच्या कोणत्याही पिढीला खासगीत बोलताना देखील कधी जमली नव्हती! फारतर सांकेतिक खाणाखुणा करुन काहीजण व्यक्त होत! मात्र जेन झी अगदी खुलेपणाने आणि टोकदार स्पष्टतेने त्यांना काय सांगायचेय ते सांगतेय! कथित संस्कृतीचा सभ्यतेचा गळका माठ त्यांनी फोडून टाकलाय, ज्यात कथित संस्कृतीरक्षक गेली कित्येक वर्षे नेटाने पाणी भरत होते!

जेन झीच्या हातातले फलक विलक्षण आहेत, त्यांचा प्रतिवाद दमछाक करणारा असेल! हा पेपर सत्ताधारी मंडळींना अनपेक्षितपणे समोर आल्याने, तो कसा सोडवायचा याचे नेमके उत्तर अजून तरी त्यांच्यापाशी नाहीये!

या आंदोलनाचे राजकीय शैक्षणिक फलित काय होईल यावर नेमके भाष्य करता येणार नाही, मात्र ह्यांच्या हातातले फलक आणि यांची देहबोली पाहू जाता हे दबून राहणाऱ्यातले सहनशील मेंगळट नाहीत हे नक्की!

ह्यांना काबूत ठेवणे ही मोठी कसरत ठरणार आहे. आधीच्या पिढीत फेक आज्ञाधारक विनम्रता नावाचा अतिरेक सामावला होता, त्याचे उट्टे ही पिढी काढणार. पटेल तेच ऐकणार बाकी सगळं कोलणार ही यांची शैली!

या पिढीचा हेवा वाटावा अशी यांची स्पष्टता! नाहीतर अख्खी हयात जाऊन देखील 'तुझ्यावर मी मरतो' हे सांगायची हिंमत न झालेले, बायकोच्या सोबतीने अळणी संसार करणारे दाढीधारी प्रेमभंगी माझ्या पिढीने पाहिले आहेत;

जेन झीच्या आधीच्या सर्व पिढ्यातल्या बायकांनी मुकाटपणे अफाट गोष्टी सोसल्यात, आता तसे घडणार नाही! ह्याचा अर्थ असा नाही की, ही पिढी स्वैराचारी, छछोर, रंगेल, नादिष्ट आहे; सगळे नाद कोळून पिऊन आयुष्य जगणारी ही पिढी आहे! वरवर आत्ममग्न आणि बेफाम वाटणारे हे पोरं-पोरी लई खतरनाक आहेत, हे एव्हाना देशाला कळून चुकलेय!

ह्यांच्या नंतरच्या अल्फा जनरेशनविषयी काय बोलणार! ती पिढी जेव्हा टिनएजमध्ये जाईल तेव्हा जगाचे चिवडे कसे लावायचे हे त्यांच्या जेन झी पालकांनी, लई भारी शिकवलेले असेल!






# मुलांच्या विचारांवर ताबा कोणाचा?

**जर आपण आपल्या मुलांना पुरावा तपासायला, प्रचार ओळखायला, प्रश्न विचारायला आणि स्वतंत्रपणे विचार करायला शिकवलं नाही, तर उद्या कोणीतरी दुसरं त्यांना काय विचारायचं, कोणावर प्रेम करायचं, कोणाचा द्वेष करायचा, कोणाला राष्ट्रभक्त म्हणायचं आणि कोणाला शत्रू समजायचं हे शिकवेल. आणि मग पुढचा भारत कसा असेल, हे वेगळं सांगण्याची गरज उरणार नाही. आपल्या मुलांना कोणाच्या मागे चालायचं हे शिकवू नका. त्यांना स्वतःच्या डोक्याने चालायला शिकवा.**

**मुक्तक जोशी,** कंटेंट क्रिएटर, छत्रपती संभाजीनगर

गाजावाजा, भावनिक व्हिडिओ, निवडक माहिती, अर्धसत्य आणि सतत एकाच बाजूची मांडणी करून संपूर्ण समाजाला किती सहजपणे एका बाजूने दुसऱ्या बाजूला झुलवता येतं, याची प्रचिती नुकत्याच झालेल्या आंदोलनानंतर पुन्हा एकदा आली.

मराठी अभिनेत्री असोत, सोशल मीडियावरील प्रभावशाली लोक असोत किंवा उच्चशिक्षित आणि प्रतिष्ठित व्यक्ती असोत, अनेकांना या आंदोलनाचं संपूर्ण चित्र पाहता आलं नाही. "हे पूर्णपणे विद्यार्थ्यांचं आंदोलन आहे, मुलांवर अन्याय झाला आहे आणि म्हणून ती रस्त्यावर उतरली आहेत" ही प्रतिमा इतकी प्रभावीपणे तयार करण्यात आली की त्यामागे कोण आहे, कोणत्या संघटना आहेत, कोणते हितसंबंध आहेत, घटनाक्रम नेमका काय आहे, मागण्या काय आहेत आणि आंदोलनात पुढे नेमकं काय घडलं, हे स्वतंत्रपणे तपासण्याची गरजच अनेकांना वाटली नाही.

जर चाळीस-पन्नास वर्षांचे, उच्चशिक्षित, अनुभवी

आणि समाजात प्रतिष्ठित असलेले लोकसुद्धा एखाद्या भावनिक नॅरेटिव्हच्या प्रभावाखाली इतक्या सहजपणे येऊ शकतात, तर सोळा-सतरा वर्षांच्या मुलांचा काय दोष? त्या वयात मुलांकडे अनुभव कमी असतो. भावना तीव्र असतात. अन्यायाविरुद्ध बंड करण्याची नैसर्गिक उर्जा असते. मित्रांचा प्रभाव प्रचंड असतो. सोशल मीडिया त्यांचं माहितीचं प्रमुख माध्यम झालेलं असतं. एखादी पोस्ट व्हायरल झाली, एखादा व्हिडिओ भावनिक वाटला, मित्रांच्या ग्रुपमध्ये एकच विचार सतत फिरू लागला की तोच सत्य वाटू लागण्याची शक्यता असते.

माझा स्वतःचा मुलगा मला सांगतो की त्याच्या ओळखीतील काही मित्र आजकाल अशा प्रकारच्या पोस्ट शेअर करू लागले आहेत आणि त्यांची विचार करण्याची दिशाही बदलताना दिसते. ही गोष्ट मला एका आंदोलनापेक्षा कितीतरी मोठी वाटते. कारण आज प्रश्न एका परीक्षेचा, एका आंदोलनाचा, एका सरकारचा किंवा एका राजकीय पक्षाचा राहिलेला नाही. प्रश्न आहे आपल्या पुढच्या पिढीच्या विचारांवर प्रभाव कोणाचा राहणार?

आज सोशल मीडियामुळे कोणत्याही देशातील बाह्य शक्ती, राजकीय हितसंबंध असलेले गट, कट्टर विचारसरणीचे लोक किंवा समाजात अस्थिरता निर्माण करू इच्छिणारे घटक तरुणांपर्यंत थेट पोहोचू शकतात. त्यासाठी त्यांना आपल्या घरात यायची गरज नाही. त्यांच्या हातात फक्त मोबाईल पोहोचला तरी पुरेसं आहे. अल्गोरिदम एकाच प्रकारचा मजकूर पुन्हा पुन्हा दाखवतो. मित्र तोच मजकूर शेअर करतात. इन्फ्लुएन्सर्स त्याच भाषेत बोलतात. काही व्हिडिओ भावनिक वातावरण तयार करतात. आणि हळूहळू एखाद्या मुलाला वाटू लागतं की त्याच्या स्क्रीनवर दिसणारं जग म्हणजेच संपूर्ण वास्तव. यालाच सर्वात गंभीरपणे समजून घेण्याची गरज आहे.

एखाद्या पिढीला नियंत्रित करण्यासाठी आज बंदूक आवश्यक नाही. तिची माहिती, भावना आणि विचार करण्याची चौकट नियंत्रित केली तरी पुरेसं आहे. म्हणून आता पालकांची जबाबदारी फक्त मुलांना चांगल्या शाळेत घालणे, क्लास लावणे, मार्क मिळवून देणे आणि चांगल्या करिअरपर्यंत पोहोचवणे एवढी राहिलेली नाही. त्यांना विचार करायला शिकवणं ही कदाचित त्याहून मोठी जबाबदारी आहे.

## विचारांपेक्षा टोळ्या तयार होतात

**जगभरात आपण पाहिलं आहे की समाजाचं तीव्र ध्रुवीकरण झालं, तर सर्वप्रथम संवाद संपतो. मग प्रत्येकाला दुसरा माणूस शत्रू वाटू लागतो. तथ्यांपेक्षा ओळख महत्त्वाची होते. विचारांपेक्षा टोळ्या तयार होतात आणि एकदा तरुण पिढी या चक्रात अडकली की समाजाला त्याची किंमत अनेक वर्षे मोजावी लागते. म्हणून आपल्या मुलांचे डोळे उघडण्याची वेळ आली आहे. पण त्याचा अर्थ त्यांच्यावर आपली राजकीय मतं लादणं नाही. उलट त्यांना इतकं सक्षम बनवा की उद्या आपण सांगितलेली गोष्टसुद्धा ते प्रश्न विचारल्याशिवाय स्वीकारणार नाहीत. कारण खरी स्वतंत्र पिढी ती नाही जी आपल्या बाजूने विचार करते. खरी स्वतंत्र पिढी ती आहे जी स्वतः विचार करते. आजची सर्वात मोठी लढाई कोणत्या पक्षाचं सरकार येणार याची नाही. आजची खरी लढाई आपल्या पुढच्या पिढीच्या मेंदूवर ताबा कोणाचा राहणार याची आहे.**

**मुलांना सांगा :** व्हायरल म्हणजे सत्य नाही. आंदोलन मोठं म्हणजे त्यातील प्रत्येक गोष्ट योग्य नाही. सरकारविरोधात बोलणारा प्रत्येक माणूस देशद्रोही नाही आणि सरकारच्या समर्थनात बोलणारा प्रत्येक माणूस राष्ट्रभक्तही नाही. "राष्ट्रभक्त कोण आणि राष्ट्रविरोधी कोण?" याचं उत्तर एखाद्या पोस्टने, हॅशटॅगने किंवा राजकीय पक्षाने ठरवू देऊ नका. व्यक्तीच्या घोषणा पाहू नका. तिच्या कृती तपासा. कोण देशासाठी काम करतंय हे ठरवताना त्याचा इतिहास तपासा, निर्णय तपासा, त्यामागचे हितसंबंध तपासा, त्याग तपासा आणि त्या निर्णयांचे देशावर झालेले प्रत्यक्ष परिणाम तपासा.जे लोक वैयक्तिक स्वार्थ बाजूला ठेवून सार्वजनिक जीवनात काम करतात, अपमान आणि टीका सहन करूनही राष्ट्रहिताला प्राधान्य देतात, त्यांचं कामही निष्पक्षपणे पाहायला मुलांना शिकवा. पण त्याच वेळी कोणत्याही नेत्याला देव बनवू नका.

# एक दिवस स्त्रिया संपावर गेल्या तर...



कविता

*मला वाटतं की जगातल्या तमाम स्त्रियांनी*
*एक दिवस संपावर जावं.*

*मातृत्वाच्या महान कर्तव्यापासून आयांनी सुट्टी घ्यावी.*
*एक दिवस मुलाला पुरुषाकडे सोपवून*
*आपल्या आवडीची कादंबरी वाचत बसावं.*
*चार वेळा न उठता निवांतपणे जेवावं.*
*जेवता-जेवता मध्येच उठून मुलाची शी धुवावी लागू नये.*
*अर्ध्या रात्री मुलाच्या रडण्याने झोपेचं खोबरं होऊ नये.*
*भल्या पहाटे दूध पाजायला उठावं लागू नये.*

*त्या एका रात्री बालपणीच्या मैत्रिणीला बोलावून*
*ड्रॉइंगरूममधल्या सोफ्यावर पसरून*
*रात्री उशिरापर्यंत गप्पा माराव्या.*
*साऱ्या आया त्या दिवशी पुन्हा मुलगी बनाव्यात.*

*परतल्यावर सांगावं की*
*किती कंटाळवाणं असतं प्रियकराचं बोलणं*
*आणि त्रासदायक आहे त्याची प्रेम करण्याची रीत.*
*सांगावं की ती आजही प्रियकराहून श्रेष्ठ आहे.*
*आणि शहरात अजूनही किती सुंदर तरुण आहेत.*
*आजही पाऊस किती रोमांचक आहे.*
*संगीत आजही किती मोहक आहे.*
*प्रेम करण्यासाठी जगात आणखी कितीतरी गोष्टी आहेत.*

*पत्नींना संपासाठी रविवार निवडावा लागेल.*
*त्या दिवशी त्या उशिरापर्यंत झोपून राहाव्यात.*
*आणि उठल्यावर पहिल्यांदा*
*दारावर लावावी आपल्या नावाची नेमप्लेट.*
*आणि हे त्यांनीच निवडलेलं नाव असावं,*
*जे उच्चारल्यावर खूप गोड वाटेल.*

*पुन्हा आपल्या घरात निवांतपणे पसरून चहा प्यावा.*
*या रविवारी पत्नींनी परिधान करावा*
*आपल्या आवडीचा रंग.*
*आपल्या आवडीचं जेवण करावं.*
*टीव्हीचा रिमोटही त्यांच्या हातात असावा.*
*आपल्या मर्जीनुसार त्यांनी जग पाहावं.*

*संपाच्या दिवशी सगळ्या नोकरदार महिलांनी*
*ऑफिसच्या लॅबीमध्ये पत्ते खेळत बसावं.*
*मोठमोठ्याने गप्पा मारत*
*त्यांच्या हास्य-विनोदांनी दणाणून जावं ऑफिस.*
*कोपऱ्या-कोपऱ्यात त्यांचं अस्तित्व जाणवावं.*
*त्या दिवशी त्यांचाच ताबा असावा*
*रिसेप्शन, कॉरिडॉर, गेस्टरूम आणि लिफ्टवर.*

*जगातल्या तमाम मुली, मैत्रिणी, सहकर्मी, दोस्त,*
*दादी, नानी, काकी, मामी, आत्या, वहिनी,*
*लेस्बियन स्ट्रेट, सिंगल, कमिटेड,*
*ही, ती, अशी, तशी, चांगली, वाईट-*
*संज्ञा, सर्वनाम, क्रियापद, विशेषण...*

*ज्या दिवशी या सगळ्या स्त्रिया संपावर जातील,*
*खात्री बाळगा, त्या दिवशी सारे पुरुष*
*स्त्री बनायला शिकतील.*
*त्या दिवशी ते पुरुषांमधून माणसामध्ये परिवर्तित होतील.*

**- मूळ हिंदी कविता : श्रुती कुशवाह**
**- मराठी अनुवाद :** विजय चोरमारे






# नात्यातला 'ब्रेकिंग पॉइंट'

**जीवनाच्या एका विशिष्ट टप्प्यावर पोहोचल्यावर, जिथे करिअरचे शिखर गाठलेले असते, समाजात मान-सन्मान असतो आणि भौतिक सुखांची कोणतीही कमतरता नसते, तिथे आयुष्य बाहेरून अगदी 'वेल सेटल' आणि परिपूर्ण दिसतं. पण कधीकधी या लखलखाटामागे एकाकीपणाचा असा काही अस्वस्थ करणारा अंधार दडलेला असतो, जो सहजासहजी कोणाच्याही नजरेस पडत नाही.**

**उचिता थोरवत-संत,** कंटेंट क्रिएटर, पुणे

आज पन्नाशी पार केलेल्या एका उच्चशिक्षित आणि मोठ्या पदावर काम केलेल्या व्यक्तीशी बोलताना हेच वास्तव समोर आलं. वयाच्या ज्या टप्प्यावर माणसाला खऱ्या अर्थाने जोडीदाराच्या प्रेमाची, संवादाची आणि शांततेची सर्वात जास्त गरज असते, नेमक्या त्याच वयात ते आणि त्यांची पत्नी एकमेकांपासून विभक्त झाले. हे ऐकताना मनात एकाच वेळी सुन्नपणा आणि एक अनामिक अस्वस्थता पसरून गेली. विचार करताना प्रकर्षाने जाणवलं की, आपण आयुष्यात कोणालाही, अगदी जवळच्या नात्यातल्या व्यक्तीलाही इतका त्रास कधीच देऊ नये, की ती व्यक्ती वैतागून स्वतःच्या मूळ स्वभावाविरुद्ध जाऊन भलतंच काही पाऊल उचलेल.

माणूस जन्मापासून एका रात्रीत बदलत नाही. पण जेव्हा नातं हळूहळू 'टॉक्सिक' (विषारी) बनायला लागतं, तेव्हा माणूस आतून हळूहळू कोलमडायला लागतो. नात्यातल्या या विषारीपणाची सुरुवात लहान गोष्टींपासून होते- सततचे टोमणे, प्रत्येक गोष्टीवर संशय, समोरच्याला सतत कमी लेखणे आणि त्याच्या अस्तित्वालाच गृहीत धरणे. प्रत्येकाचा एक मूळ स्वभाव असतो-कोणी सहनशील असतं, कोणी जुळवून घेणारं, तर कोणी कुटुंब जपणारे शांत वृत्तीचं असतं. ते या टॉक्सिक वातावरणातही सर्वकाही गिळून नातं टिकवून ठेवण्याचा प्रयत्न करत राहतात.

पण अशा टॉक्सिक नात्यात समोरचा माणूस या सोशिकपणाचा गैरफायदा घ्यायला लागतो. आपण अनेकदा गप्प राहणाऱ्या व्यक्तीच्या शांततेला त्याची हतबलता किंवा

कमजोरी समजण्याची खूप मोठी चूक करतो. 'हा कुठे जाणार आहे?' किंवा 'ही काय करणार आहे?' या अहंकाराच्या भावनेतून नकळत होणाऱ्या मानसिक त्रासाची धार अधिकच तीव्र होत जाते. पण समोरची व्यक्ती जेव्हा गप्प राहून सर्व सहन करत असते, तेव्हा ती हरलेली नसते; तर ती आपले कुटुंब आणि नातं वाचवण्याचा शेवटचा केविलवाणा प्रयत्न करत असते.

पण जगातील प्रत्येक गोष्टीला आणि सहनशीलतेला एक 'ब्रेकिंग पॉइंट' असतोच. जेव्हा टॉक्सिक नात्यात रोजचा होणारा मानसिक छळ सहनशक्तीच्या पार जातो, जेव्हा स्वाभिमान पूर्णपणे चिरडला जातो आणि मनातील शांतता हीच जगातील सर्वात मोठी सुरक्षितता वाटू लागते, तेव्हा तो शांत राहणारा माणूसही असा निर्णय घेतो, ज्याचा कोणी विचारही केलेला नसतो. अशा टॉक्सिक नात्यातून बाहेर पडणे सोपे नसते, आणि वयाच्या पन्नाशीनंतर विभक्त होण्याचा निर्णय घेणे तर मुळीच नाही. कारण हा निर्णय क्षणिक रागाच्या भरात घेतलेला नसतो, तर वर्षानुवर्षे त्या विषारी वातावरणात गुदमरलेल्या श्वासांचा आणि आतल्या आत कुढत सहन केलेल्या त्रासाचा तो एक अपरिहार्य आणि अटळ शेवट असतो.

यश, पैसा, उच्च शिक्षण आणि समाजातला हुद्दा आपल्याला सोयी-सुविधा आणि ओळख मिळवून देऊ शकतात; पण आयुष्याच्या संध्याकाळी घरात मिळणारी खरी शांतता आणि जोडीदाराची विश्वासू साथ हीच माणसाची खरी संपत्ती असते. नात्यात प्रेम थोडे कमी असले तरी चालून जाते, पण ते नातं 'टॉक्सिक' नसावं आणि एकमेकांचा आदर जपणे अत्यंत गरजेचे असते. म्हणून कोणत्याही नात्यात कोणालाही इतके दुखावू नये, इतके कोंडीत पकडू नये की, त्यांना स्वतःच्या अस्तित्वाची आणि स्वाभिमानाची राख वाचवण्यासाठी स्वतःचाच मूळ स्वभाव बदलावा लागेल.बरोबर ना?

# हायड्रोजन ट्रेन : ग्रीन फ्युचरसाठी धडपड?




**देशातल्या ९९ टक्के रेल्वेमार्गांचं विद्युतीकरण पूर्ण झालेलं आहे. असे असताना हायड्रोजन ट्रेन्स खरोखरच भारतीय रेल्वेला फायदेशीर ठरणार आहेत, की ग्रीन फ्युचरसाठी ही धडपड सुरु आहे, हे येणारा काळच सांगेल.**

**मन्सूर मुल्ला,** पत्रकार, पुणे

नुकतेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते भारतातील पहिल्या हायड्रेलचं म्हणजेच हायड्रोजनवर चालणाऱ्या ट्रेनचं उद्घाटन झालं. हरियाणातील जिंद ते सोनिपत या ८९ किलोमीटरच्या ट्रॅकवर प्रायोगिक तत्त्वावर ही ट्रेन चालणार आहे. जर्मनी, जपान, चीन आणि अमेरिकेनंतर हे प्रगत तंत्रज्ञान वापरणाऱ्या मोजक्या देशांच्या यादीत आता भारताचा समावेश झालाय. विशेष म्हणजे, ही ट्रेन संपूर्ण भारतीय बनावटीची असून 'रिसर्च, डिझाइन्स अँड स्टँडर्ड्स ऑर्गनायझेशन' (RDSO) या आपल्याच संस्थेने तिची रचना केली आहे.

२ मार्च २०२६ रोजी जिंद-सोनिपत मार्गावर ट्रेनची पहिली यशस्वी चाचणी पार पडली. दोन ड्रायव्हिंग पॉवर कार आणि आठ प्रवासी डब्यांचा समावेश असणाऱ्या या दहा डब्यांच्या ट्रेनमध्ये सुमारे २,६००

लोक आरामात प्रवास करू शकतात. इतर रेल्वेगाड्यांशी तुलना केली तर ही क्षमता जवळपास ५०० ने जास्त आहे. ही हायड्रोजन ट्रेन ताशी ११० किलोमीटर वेगाने धावू शकते, मात्र सध्या सुरक्षेच्या कारणास्तव तिला ताशी ७५ किलोमीटर वेगाने प्रवास करण्याचीच परवानगी देण्यात आलीये.

वर वर पाहता ही गाडी नेहमीच्या ट्रेनसारखीच दिसते, पण खरी कमाल तिच्या इंजिनमध्ये आहे. ट्रेनमध्ये १२०० किलोवॅट क्षमतेची 'हायड्रोजन फ्युएल सेल प्रणाली' बसवण्यात आलीये. यामध्ये 'प्रोटॉन एक्सचेंज मेंब्रेन फ्युएल सेल' या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला गेलाय. सोप्या भाषेत सांगायचं तर, हे इंजिन स्वतःचं इंधन स्वतःच बनवतं. गाडीवरील टाक्यांमध्ये साठवलेला हायड्रोजन आणि बाहेरील हवेतला ऑक्सिजन यांच्यात एक रासायनिक प्रक्रिया घडवली जाते, त्यातून वीज तयार होते. याच विजेवर गाडी धावते. या संपूर्ण प्रक्रियेतून फक्त पाण्याची वाफ बाहेर टाकली जाते. म्हणजे शंभर टक्के प्रदूषणमुक्त!

पण हायड्रोजन हे इंधन पारंपरिक इंधनांपेक्षा जितकं स्वच्छ आहे, तितकंच ते कित्येक पटीने ज्वलनशील आणि धोकादायकही आहे. डिझेलमध्ये प्रति किलो ४३ मेगाज्यूल्स इतकी उर्जा असते, तर हायड्रोजनमध्ये प्रति किलो १२० मेगाज्यूल्स इतकी उर्जा सामावलेली असते. त्यामुळे हायड्रोजन ट्रेनच्या सुरक्षिततेसाठी काटेकोर उपाययोजना कराव्या लागतात.

या संपूर्ण ट्रेनमध्ये आणि मार्गातील सर्व स्टेशन्सवर हायड्रोजनची गळती ओळखणारे सेन्सर्स आणि फ्लेम डिटेक्टर्स बसवण्यात आले आहेत. ट्रेनमध्ये कुठेही अतिरिक्त उष्णता किंवा आग आढळल्यास हायड्रोजनचा पुरवठा आपोआप खंडित होण्याची सोय आहे. इंधन पुरवठ्यासाठी जिंद येथे देशातला सर्वात मोठा, ३००० किलो क्षमता असलेला हायड्रोजन साठवणूक प्रकल्प उभारण्यात आलाय.

पण एक लक्षात घेण्यासारखी गोष्ट, म्हणजे प्रगत देशांमध्येही बहुतेक ठिकाणी एकूण रेल्वेगाड्यांच्या तुलनेत हायड्रोजन ट्रेन्सचं प्रमाण १ टक्के आहे. काही ठिकाणी तर ते ०.१ टक्क्यांहून कमी आहे. का? कारण हायड्रोजन तंत्रज्ञानात काही व्यावहारिक अडचणी आहेत.

पर्यावरणपूरक (ग्रीन) हायड्रोजन इंधन मोठ्या दाबाखाली साठवावं लागतं. अशी साठवणूक करणं, इंधनाची वाहतूक करणं आणि पुन्हा फ्युएल सेलमध्ये त्याचं विजेत रूपांतर करणं, या प्रक्रियेत खूप ऊर्जा वाया जाते. थेट पॉवरग्रीडवर चालणाऱ्या इलेक्ट्रिक ट्रेन्स यापेक्षा कितीतरी पटीने जास्त प्रभावी ठरतात. तेलापेक्षा जास्त घनता असल्यामुळे हायड्रोजनसाठी मोठ्या साठवणूक क्षमतेची गरज पडते. भारतात आजघडीला रेल्वेचे जवळपास ९९ टक्के मार्ग इलेक्ट्रिक ग्रीडला जोडण्यात आले आहेत. हायड्रोजन ट्रेनचं जाळं पसरायचं झालं तर प्रत्येक मार्गावर नव्याने पायाभूत सुविधा उभारण्यासाठी कोट्यवधींचा खर्च येईल. शिवाय ग्रीन हायड्रोजनच्या उत्पादनाचा खर्च पारंपरिक डिझेलच्या उत्पादनापेक्षा अजूनही खूप जास्त आहे.

## प्रदूषणमुक्त प्रवासाची क्रांती

**काही प्रगत देशांनी हायड्रोजनवर चालणाऱ्या सार्वजनिक वाहतूक सुविधा उभारल्या आहेत. २००२ मध्ये कॅनडामध्ये हायड्रोजन ट्रेनची सुरुवात झाली. तिथल्या क्युबेक खाणीत पहिल्यांदा १७ किलोवॅट क्षमतेचं हायड्रोजन रेल्वे इंजिन वापरलं गेलं. एप्रिल २००६ मध्ये जपानच्या ईस्ट जपान रेल्वे कंपनीनं जगातली पहिली हायड्रोजन रेलकार विकसित केली. चीनमध्ये २०१० मध्ये हायड्रेल प्रोटोटाइपची चाचपणी केली गेली. २०२६ पासून तिथल्या नानहू भागात प्रवासासाठी हायड्रोजनवर चालणारी ट्राम वापरात आहे. सप्टेंबर २०१६ मध्ये जर्मनीच्या अल्सटॉम कंपनीने आयलिंट ही ट्रेन जगासमोर आणली. याच ट्रेनने पुढे युरोपमध्ये स्वच्छ आणि प्रदूषणमुक्त प्रवासाची क्रांती घडवून आणली. २०२४ मध्ये स्वित्झर्लंडच्या स्टॅडलर कंपनीने विकसित केलेल्या हायड्रोजन ट्रेनने सलग २,८०३ किलोमीटरचा प्रवास करून जागतिक विक्रम प्रस्थापित केला. अमेरिकेत २०२५ मध्ये फ्लर्ट एच-२ या हायड्रोजन इंजिन पॅसेंजर ट्रेनची सुरुवात झाली.**









भारतातील टॉप 10 आयटी रोजगार देणारी शहरे

(2026 चा अंदाज)

| क्रमांक | शहर | अंदाजित आयटी कर्मचारी | प्रमुख आयटी हब |
|---|---|---|---|
| 1 | बेंगळुरु | 25 लाख - 32 लाख | इलेक्ट्रॉनिक सिटी, व्हाइटफील्ड, ORR |
| 2 | हैदराबाद | 15 लाख - 20 लाख | HITEC सिटी, गाचीबोवली |
| 3 | पुणे | 10 लाख - 14 लाख | हिंजवडी, खराडी, मगरपट्टा |
| 4 | चेन्नई | 10 लाख - 13 लाख | OMR आयटी कॉरिडॉर, सिरुजरी |
| 5 | मुंबई | 9 लाख - 12 लाख | पवई, नवी मुंबई, BKC |
| 6 | दिल्ली NCR (गुरुग्राम आणि नोएडा) | 9 लाख - 11 लाख | सायबर सिटी, नोएडा एक्सप्रेसवे |
| 7 | कोलकाता | 3.5 लाख - 5 लाख | सेक्टर V, न्यू टाउन |
| 8 | अहमदाबाद | 2.5 लाख - 4 लाख | GIFT सिटी, SG हायवे |
| 9 | कोची | 2 लाख - 3.5 लाख | इंफ्रोपार्क, स्मार्टसिटी |
| 10 | चंदीगड त्रिसिटी | 1.5 लाख - 3 लाख | IT पार्क चंदीगड, मोहाली |



भारतातील टॉप १० सर्वात लांब मेट्रो सिस्टीम्स

भारतातील (कार्यरत लांबीनुसार)

क्रमवार जून २०२६ पर्यंतच्या कार्यरत लांबीवर आधारित

| | | |
|---|---|---|
| 1 | दिल्ली मेट्रो | 416 किमी, 303 स्टेशना |
| 2 | मुंबई मेट्रो | 101.4 किमी, 80 स्टेशन्स |
| 3 | नम्मा मेट्रो (बेंगकुरू) | 96 किमी, 66 स्टेशन्स |
| 4 | कोलकाता मेट्रो | 74 किमी, 59 स्टेशन्स |
| 5 | हैदराबाद मेट्रो | 69 किमी, 57 स्टेशन्स |
| 6 | अहमदाबाद मेट्रो | 54.7 किमी, 38 स्टेशन्स |
| 7 | चेन्नई मेट्रो | 54.6 किमी, 36 स्टेशन्स |
| 8 | नागपूर मेट्रो | 38.2 किमी, 36 स्टेशन्स |
| 9 | पुणे मेट्रो | 32.9 किमी, 24 स्टेशन्स |
| 10 | नोएडा मेट्रो एक्वा लाईन | 29.7 किमी, 21 स्टेशन्स |



पावसाळ्यात
कोणते पदार्थ खावेत आणि कोणते टाळावेत?
पावसाळ्यात रोगप्रतिकारक शक्ती कमी होते, त्यामुळे आहाराची विशेष काळजी घ्या.
खावेत असे पदार्थ
गरम सूप
रोगप्रतिकारक शक्ती वाढवते आणि घशाला आराम देते.
मूग डाळ
पचायला हलकी आणि आरोग्यासाठी फायदेशीर.
वाफवलेल्या भाज्या
पचायला सोप्या आणि पोषकतत्त्वांनी भरपूर.
हर्बल टी
तुळस, आलं, दालचिनीचा चहा रोगप्रतिकारक शक्ती वाढवतो.
ताजे फळ
व्हिटॅमिन्स आणि मिनरल्स देऊन शरीर स्वस्थ ठेवतात.
खिचडी
पचायला सोपी आणि ऊर्जादायक असते.
टीप: कोमट पाणी प्या, हात स्वच्छ ठेवा आणि ताजे, घरचे जेवण खा.
टाळावेत असे पदार्थ
स्ट्रीट फूड
अस्वच्छतेमुळे पोटाचे विकार होण्याची शक्यता जास्त.
थंड पेये
घशाचा त्रास, सर्दी-खोकला वाढू शकतो.
तळलेले पदार्थ
जड आणि पचायला कठीण, अपचन होऊ शकते.
जास्त डेअरी पदार्थ
कफ वाढवतात आणि सर्दी होण्याची शक्यता वाढते.
शिळे अन्न
बॅक्टेरियाची वाढ होते आणि संक्रमणाचा धोका वाढतो.
अल्कोहोल
रोगप्रतिकारक शक्ती कमी करते आणि आजारांना आमंत्रण देते.
टीप: बाहेरचे अन्न टाळा, स्वच्छतेची काळजी घ्या आणि पाणी नेहमी उकळून प्या.
सुदृढ आहार घ्या, निरोगी राहा आणि पावसाळा आनंदात साजरा करा!




पावसाळ्यात लहान मुलांची
काळजी कशी घ्याल?
थोडीशी काळजी, निरोगी बालपणाची हमी!
पावसाळ्यात सर्दी, खोकला, ताप, जुलाब, व्हायरल इन्फेक्शन, डेंग्यू-मलेरिया यांसारख्या आजारांचे प्रमाण वाढते.
ही काळजी घ्या आणि तुमच्या मुलांना निरोगी ठेवा.
1 स्वच्छ पाणी पिण्यास द्या
• उकळून थंड केलेले किंवा शुद्ध केलेले पाणी द्या.
• बाहेरील पाणी किंवा बर्फाचे पदार्थ टाळा.
2 हात स्वच्छ धुण्याची सवय लावा
• जेवणापूर्वी आणि शौचालयानंतर साबणाने हात धुणे आवश्यक.
• बाहेरुन आल्यावरही हात-पाय स्वच्छ धुवा.
3 पौष्टिक आहार द्या
• ताजी फळे, भाज्या, दूध आणि प्रथिनयुक्त पदार्थ द्या.
• रस्त्यावरील उघडे अन्न टाळा.
4 ओले कपडे लगेच बदला
• पावसात भिजल्यास लगेच कोरडे कपडे घालायला द्या.
• ओल्या कपड्यांमुळे सर्दी-खोकल्याचा धोका वाढतो.
5 डासांपासून संरक्षण करा
• घराभोवती पाणी साचू देऊ नका.
• कुलर, टाकी, कुंडी यातील साचलेले पाणी नियमितपणे काढून टाका.
• मच्छरदाणी किंवा डासप्रतिबंधक उपाय वापरा.
6 पुरेशी झोप आणि विश्रांती
• मुलांची रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यासाठी पुरेशी झोप आणि विश्रांती खूप महत्त्वाची आहे.
• रोज ठराविक वेळेस झोपण्याची सवय लावा.
7 ताप, जुलाब किंवा श्वास घेण्यास त्रास झाल्यास
• घरगुती उपायांवर अवलंबून न राहता त्वरित डॉक्टरांचा सल्ला घ्या.
ताप
जुलाब
सतत खोकला
श्वास घेण्यास त्रास
निरोगी मूल आनंदी परिवार निरोगी समाज
लक्षात ठेवा!
"पावसाळ्यातील थोडीशी काळजी तुमच्या मुलाला अनेक आजारांपासून दूर ठेवू शकते."
अविरिक्त काळजी
पावसात बाहेर जाताना छत्री किंवा रेनकोटचा वापर करा.
ओले बूट/चप्पल वापरणे टाळा.
घरात हवा खेळती ठेवा आणि स्वच्छता राखा.
लसीकरण वेळेवर पूर्ण करा.
सॅनिटायझर आणि टिश्यू सतत सोबत ठेवा.
स्वच्छता पाळा, सुरक्षित रहा आणि तुमच्या मुलांना निरोगी ठेवा !




चार धाम यात्रा दरम्यान
कोणत्या धामातून काय आणावे?
1 बद्रीनाथ
वर्णन:
सत्ययुगाचे प्रतीक असलेले पहिले धाम बद्रीनाथ आहे. येथून तुळशीची माळा किंवा तुळशीचे रोप आणावे.
वैजयंती माळा:
सात्विकता, आरोग्य आणि विष्णु कृपेचे प्रतीक.
2 रामेश्वरम
वर्णन:
त्रेतायुगाचे प्रतीक असलेले दुसरे धाम रामेश्वरम आहे. येथून पवित्र जल (तीर्थ) आणावे.
पवित्र जल:
अंतर्गत शुद्धी, पापक्षय आणि शांततेचे प्रतीक.
3 द्वारकाधीश
वर्णन:
श्रीकृष्णाचे स्थान असलेले द्वारकाधीश हे द्वापारयुगाचे प्रतीक आहे. येथून गोपीचंदन आणि मोरपीस आणावे.
गोपीचंदन आणि मोरपीस:
भगवान श्रीकृष्णाची कृपा, भक्ती आणि सकारात्मक ऊर्जेचे प्रतीक.
4 जगन्नाथ पुरी
वर्णन:
चौथे स्थान जगन्नाथ पुरी असून हे कलियुगातील निवासस्थान मानले जाते. येथून वेताची/काठीची छडी आणि सुदर्शन चक्राचे प्रतीक आणावे.
छडी/काठी:
विजय, सुरक्षा आणि सौभाग्याचे प्रतीक.
"ही पवित्र स्मृतीचिन्हे तुमच्या घरी धन-धान्य, सुख-शांती आणि ईश्वराची कृपा घेऊन येतात."




महाराष्ट्रातील
प्रमुख घाट
महाराष्ट्रातील डोंगररांगांमधील हे घाट व्यापार, प्रवास आणि निसर्गसौंदर्यासाठी प्रसिद्ध आहेत.
अ.क्र. | घाटाचे नाव | जोडणारी शहरे / मार्ग
1 | थळ (कसारा) घाट | मुंबई – नाशिक
2 | बोर (खंडाळा) घाट | मुंबई – पुणे
3 | माळशेज घाट | कल्याण – जुन्नर – अहमदनगर
4 | नाणेघाट | कल्याण – जुन्नर
5 | दिवे घाट | पुणे – बारामती
6 | खंबाटकी घाट | पुणे – सातारा
7 | वरंधघाट | महाड – भोर – पुणे
8 | ताम्हिणी घाट | मुंबई – पुणे
9 | आंबेनळी घाट | चिपळूण – संगमेश्वर
10 | पसरणी घाट | वाई – महाबळेश्वर
11 | कुंभार्ली घाट | खेड – चाकण – जुन्नर
हे घाट केवळ प्रवासाचा मार्गच नाहीत, तर निसर्ग, इतिहास आणि सांस्कृतिक वारसा जपणारे खजिने आहेत.

# विठोबा मिसिंग इन पंढरपूर...

**तुम्हाला जर पांडुरंगाला खऱ्या अर्थाने भेटायचे असेल, संतांशी संवाद साधायचा असेल आणि महाराष्ट्राची खरी वैचारिक परंपरा समजून घ्यायची असेल, तर विनायक होगाडे लिखित 'विठोबा मिसिंग इन पंढरपूर' ही कादंबरी एकदा वाचायलाच हवी!**

**संदीप गायकवाड,** कंटेंट क्रिएटर

महाराष्ट्राने देशाला काय दिलं असा जर प्रश्न असेल तर त्याच उत्तर म्हणजे, महाराष्ट्राने देशाला सांस्कृतिक आणि धार्मिक शहाणपण दिलं, असं मी अभिमानाने म्हणू शकतो. आणि हे शहाणपण ज्या विचारधारेतून आलं त्या विचारधारेचं नाव म्हणजे वारकरी संप्रदाय होय. सनातनी कर्मकांडांतून निर्माण झालेल्या सामाजिक विषमतेच्या विळख्यातून समाजाला मुक्त करण्याचे क्रांतीकार्य वारकरी संप्रदायाने केले. हे या महाराष्ट्राच्या मातीने पाहिले आहे आणि अनुभवलेही आहे. म्हणूनच आज महाराष्ट्राच्या रक्ता-रक्तात आणि विचारांत समतेची बीजे खोलवर रुजलेली दिसतात. या विचारांचा मळा ज्या जमिनीवर फुलाला आहे, ती जमीन म्हणजे पंढरीचा विठ्ठल होय, पांडुरंग होय, विठोबा होय. रुसलेल्या रखुमाईसाठी द्वारकेचा कृष्ण दिंडीर वनात आला आणि इथेच पुंडलिकाने फेकलेल्या विटेवर स्थायिक झाला.. तोही थोड्या थोडक्या काळासाठी नव्हे तर तब्बल अठ्ठावीस युगांसाठी.

तोच कटीवर हात ठेवून भक्तांची वाट पाहणारा कृष्ण नकळतपणे विठ्ठल झाला, पांडुरंग झाला, विठोबा झाला आणि सगळ्या लेकरांची आई झाला. या पेक्षा वेगळं चरित्र नसलेल्या या पांडुरंगाच्या प्रेमात महाराष्ट्र शेकडो वर्षांपासून पडलेला आहे. त्या प्रेमाची अनुभूती जर तुम्हाला घ्यायची असेल तर संत साहित्याकडे वळा... संत साहित्य जे जे सांगेल, जे जे दाखवेल आणि ज्याचा ज्याचा अनुभव घडवून आणेल तेच चरित्र बा विठोबाचं आहे, यापेक्षा वेगळं असं काहीच काही.

**साहित्य**




याच विठ्ठल चरित्राचा अलौकिक अनुभव आपल्या अफाट कल्पनाविलास करण्याची ताकद असलेल्या बुद्धीच्या जोरावर लेखक, पत्रकार विनायक होगाडे हे त्यांच्या 'विठोबा मिसिंग इन पंढरपूर' या पुस्तकातून आपल्याला घडवून आणतात. 'कोण जाणे ? पुंडलिकाने फेकलेल्या विटेवर विठोबा उभ्या उभ्याच, अठ्ठावीस युगांचा एखादा डुलका घेत असेल तर..?'

असा प्रश्न लेखकाच्या मनात पंढरपूरच्या विठ्ठल मंदिराला प्रदक्षिणा घालताना येतो आणि त्या डोक्यातून कल्पनाविलासाचा वटवृक्ष विस्तारतो आणि तो आपल्या समोर 'विठोबा मिसिंग इन पंढरपूर' या कादंबरीच्या रूपाने उभा रहातो.

विठोबाचा अठ्ठावीस युगांचा डुलका अचानक भंग पावतो. विट सोडून विठोबा मंदिराच्या बाहेर पडतो. त्याच दैवत्व नाहीस होत. देव चोरीला गेला, देव चोरीला गेला म्हणून मोठी खळबळ उडते, पंतप्रधानांच्या हस्ते दुसऱ्या

मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करण्याची आणि घागरी विठोबाचे प्राण नवीन मूर्तीत फुंकण्याची घोषणा मुख्यमंत्र्यांकडून केली जाते...

बाहेर हा राजकीय आणि सामाजिक गोंधळ माजलेला असताना, विठोबाच्या मनात मात्र एक वेगळाच कल्लोळ सुरू असतो. 'मी कोण? कुठून आलो? का आलो? आणि विटेवर का उभा आहे?' अशा अनेक प्रश्नांचे काहूर घेऊन तो रखुमाईच्या मदतीने स्वतःच्याच शोधासाठी निघतो. त्याचा हा शोधप्रवास ज्ञानोबांपासून तुकोबांपर्यंत, तुकोबांपासून साने गुरुजींपर्यंत आणि तिथून थेट आजच्या आधुनिक काळापर्यंत सतत सुरू राहतो.

हा प्रवास इतका विलक्षण झालेला आहे की स्वतःच्या शोधात निघालेला पांडुरंग अपासुकपणे आपल्याला ही भेटून जातो, समजून जातो, उमजून जातो. पांडुरंगाच्या अवताराच मर्म आणि वारकरी संप्रदायाच्या उत्पत्तीच प्रयोजन नक्की काय आहे, या अत्यंत महत्त्वाच्या प्रश्नाचं उत्तर म्हणजे ही कादंबरी आहे आणि या विधानाची सत्यता ही कादंबरी वाचल्यानंतर तुम्हाला जाणवेल याबाबत माझ्या मनात कसलीही शंका नाही. वारकरी संप्रदायाची बंडखोरी आणि तिने महाराष्ट्राला दिलेला समतेचा विचार किती शाश्वत आहे याची जाणीव अधिक दृढ या कादंबरीने केली. वारकरी संप्रदायात झालेली नव हिंदुत्ववाद्याची घुसखोरी तापदायक आहे. हीच नव हिंदुत्ववाद्यांची टोळी ज्ञानोबा-तुकोबांचा विचार पायदळी तुडवून पांडुरंगाचा पदोपदी अपमान करते आहे. हे पाहून जीव मात्र सतत तीळतीळ तुटतं राहतो.

संतांनी ज्या विचारांसाठी आयुष्य पणाला लावले, तो संघर्ष आज मातीमोल होतो की काय, अशी भीती वाटतं राहते. परंतु तरीही लेखक विनायक होगाडे यांच्या सारखे समकालीन लेखक जेव्हा तोच ज्ञानोबा-तुकोबांचा विचार या मराठी मातीत पुन्हा पुन्हा पेरू पाहतात, तेव्हा मात्र चित्र आशादायी वाटतं आणि मन हलकं होतं. तुम्हाला जर पांडुरंगाला खऱ्या अर्थाने भेटायचे असेल, संतांशी संवाद साधायचा असेल आणि महाराष्ट्राची खरी वैचारिक परंपरा समजून घ्यायची असेल, तर विनायक होगाडे लिखित 'विठोबा मिसिंग इन पंढरपूर' ही कादंबरी एकदा वाचायलाच हवी! इतकेच.












लक्षवेधी

# 'लॉ ऑफ अट्रॅक्शन' चा भ्रामक खेळ

**एखाद्या अमानुष गुन्ह्याचे समर्थन कर्मसिद्धांत किंवा 'लॉ ऑफ अट्रॅक्शन'च्या नावाखाली करता येऊ शकते का? निरपराध बालकांवर होणाऱ्या अत्याचारांचे कारण त्यांच्या पूर्वजन्मातील कर्मांमध्ये शोधणे ही अध्यात्माची शिकवण आहे की संवेदनशीलतेचा पराभव? अशाच एका अनुभवातून लेखकाने उपस्थित केलेले हे अस्वस्थ करणारे प्रश्न समाजातील विवेक, अध्यात्म आणि जबाबदारी यांचा नव्याने विचार करायला भाग पाडतात.**

**डॉ. विजय रणदिवे**, पुणे

'तुमच्या आयुष्यात घडणारी प्रत्येक घटना तुम्ही स्वतः तुमच्या विचारांनी आकर्षित केलेली असते.' 'तुमच्याशी घडणाऱ्या प्रत्येक चांगल्या-वाईट घटनेला तुमचे स्वतःचे विचार आणि कर्म कारणीभूत असतात.' 'एखाद्या बारा-तेरा वर्षांच्या मुलीवर तीस जणांनी सामूहिक बलात्कार केला, तर त्या घटनेलाही त्या मुलीच्या मागील जन्मातील विचार किंवा कर्म कारणीभूत असतील.' हे वाचून संताप आला ना? तळपायाची आग मस्तकात गेली ना?

असे विधान करणाऱ्या व्यक्तीविषयी प्रचंड रोष निर्माण झाला ना? व्हायलाच हवा. पण ही विधानं माझी नाहीत. ही माझी मतंही नाहीत. ही 'लॉ ऑफ अट्रॅक्शन' (आकर्षणाचा सिद्धांत) किंवा कर्मसिद्धांत मानणाऱ्या काही लोकांची भूमिका आहे. 'लॉ ऑफ अट्रॅक्शन' शिकवणाऱ्या एका मोटिव्हेशनल स्पीकरच्या ऑनलाइन वेबिनारमध्ये मी सहभागी झालो होतो.

प्रशिक्षकाला मी एक प्रश्न विचारला होता.'जेव्हा एखाद्या तीन वर्षांच्या चिमुरडीवर अत्याचार करून तिची हत्या केली जाते, तेव्हा त्या अमानुष घटनेमागे 'लॉ ऑफ अट्रॅक्शन' कसा काम करत असतो?'

त्यावर तो निर्लज्जपणे म्हणाला, 'त्या मुलीच्या मागील जन्मातील





विचार किंवा कर्मांमुळेच या जन्मात तिच्यासोबत ही घटना घडली असावी.' ते ऐकताच माझा संताप अनावर झाला. अशा विचारांचा मी तीव्र शब्दांत निषेध केला. पण त्याहून अधिक धक्कादायक गोष्ट म्हणजे त्या झूम मीटिंगमध्ये उपस्थित असलेल्या वीस-तीस जणांपैकी एकाही व्यक्तीने माझ्या प्रश्नाला पाठिंबा दिला नाही.

उलट अनेक जण त्या प्रशिक्षकाच्या भूमिकेचे समर्थन करत होते.अलीकडेच तेरा वर्षांच्या एका मुलीचे अपहरण करून सलग चार दिवस तिच्यावर तीस नराधमांनी अत्याचार केल्याची बातमी समोर आली. अशा स्वरूपाच्या घटना या देशात वारंवार घडत असतात.

ही बातमी वाचल्यानंतर मी मुद्दाम त्या मैत्रिणीला फोन केला, जिने मला त्या वेबिनारमध्ये सहभागी होण्याचे निमंत्रण दिले होते. मी तिला विचारले, 'या घटनेला कोण जबाबदार आहे?' ती म्हणाली, 'घटना अत्यंत दुर्दैवी आणि गंभीर आहे. पण काही प्रश्नांची उत्तरं नसतात.'

अशाच प्रकारच्या उत्तराची मला अपेक्षा होती. कारण अनेक तथाकथित आध्यात्मिक लोक अशा प्रश्नांवर सखोल चर्चा टाळतात. ते अस्वस्थ होतात. त्यांच्या मते अशा 'नकारात्मक' घटनांवर चर्चा केली तरी त्या आपल्या आयुष्यात आकर्षित होतात. त्यामुळे प्रश्न विचारण्याऐवजी विषय टाळणेच त्यांना अधिक सुरक्षित वाटते.

मात्र मला एक प्रश्न कायम पडतो. जर 'लॉ ऑफ अट्रॅक्शन' आणि कर्मसिद्धांत इतके अचूक असतील, तर जगातील सर्वाधिक धार्मिक, देवपूजक आणि सामूहिक प्रार्थना करणाऱ्या समाजांमध्ये असे भीषण गुन्हे अधिक का घडतात? आणि तुलनेने कमी धार्मिक किंवा नास्तिक समाजांमध्ये अशा घटना तुलनेने कमी का आढळतात?

या प्रश्नांची तर्कसंगत उत्तरे या विचारसरणीकडे नसतात. अनेकदा विषय बदलला जातो किंवा चर्चा टाळली जाते. एकेकाळी मीही या विचारविश्वाचा भाग होतो. माझीही भूमिका काही प्रमाणात अशीच होती. पण मी माझी संवेदनशीलता जिवंत ठेवली.

प्रश्न विचारण्याची वृत्ती जपली. अन्यायाविषयी अस्वस्थ होण्याची क्षमता मरू दिली नाही. त्यामुळे या विचारसरणीपासून स्वतःला दूर करण्याचा निर्णय घेतला. आज मला याचाच अभिमान वाटतो की अध्यात्माच्या नावाखाली मी माझी माणुसकी गमावली नाही.मला माहीत आहे, अशा घटना मी एकट्याने थांबवू शकत नाही. माझ्यात तेवढी शक्ती नाही. पण अशा घटनांचे तर्कहीन समर्थन करणाऱ्यांप्रमाणे गप्प बसणेही मला मान्य नाही.

धर्म, अध्यात्म आणि श्रद्धा यांचा आदर राखत असतानाच विवेक, प्रश्न विचारण्याची वृत्ती आणि मानवी संवेदनशीलता जपणे तितकेच आवश्यक आहे. कारण प्रश्न विचारणारा समाजच अन्यायाला खऱ्या अर्थाने आव्हान देऊ शकतो आणि विवेकाची ठिणगी चेतवू शकतो.

# जस्ट जोकिंग


पोलीस येतायत !
Z-Z-Z
'सीबीआय' वाले येतायत !
Z-Z-Z
'ईडी'वाले येतायत !
Z-Z-Z
तुकाराम मुंढे येतायत !!
ALOK


त्यांनी स्पष्ट सांगितलं... ते आपल्याला सोडून जाणार नाहीत !
शपथ नाही ना घेतली...?
Alok


'कांद्याला' भाव मिळत नाही म्हणून
तुम्ही शेतकरयांना "बांबु" लावा असा सल्ला दिला
आता कांदा टंचाई जाणवणार असं तुम्ही वक्तव्य केले
मग आता तुम्ही नागरिकांना 'बांबु' खा असा सल्ला देणार?
निसर्गाच्या हानीमुळे कांद्याच्या भावात किरकोळ तेजी..






पोरासमोर बातम्या पाहू नका हो..
त्याला प्रश्न विचारले की तो सर्रास
लोकप्रतिनिधींची भाषा वापरतो..












# पीअर प्रेशर आणि टीनएजर्स




**पीअर प्रेशरमुळे काही पॉझिटिव्ह तर काही निगेटिव्ह परिणाम होत असतात. पॉझिटिव्ह पीअर प्रेशरमधून मुलं आपल्या स्टेबिलिटीबद्दल इन्शयोर होतात. स्पर्धेत टिकाव धरावा याकरता त्यांना प्रेरणा मिळते, शिस्त लागते. खरं म्हणजे टीनएजर्सच्या आयुष्यात त्यांच्या पालकांचाही मोठा इनफ्लुएन्स असतो. जर त्यांनी मुलांवर या वयात असलेलं प्रेशर समजून घेतलं आणि या प्रेशरला मुलांना कसं तोंड देता येईल हे माहीत करून घेतलं तर नक्कीच फायदा होईल. हेल्दी फ्रेंडशिप ठेवून सपोर्ट करणं तसेच रिस्पॉन्सिबल बिहेवियर आणि ओपन राहून जजमेंट फ्री फॅमिली संवाद करणं या तीन की कॉम्पोनन्टस वापरल्या तर मुलांना हे प्रेशर सांभाळण्यासाठी पालकांना मदत करता येईल.**


**डॉ. स्वाती गानू,**
मानसोपचार तज्ज्ञ, मुंबई


आठवीत कॉन्वहेंट स्कूलमध्ये शिकणारा कौस्तुभ जेव्हा समुपदेशनासाठी आला तेव्हा त्याच्या पालकांनी त्याची अभ्यासातील प्रगती ढासळली आहे असं सांगितलं. प्रिन्सिपलनी पालकांना शाळेत बोलावून त्याच्याबद्दलची कम्प्लेंट सांगितली की त्याने नववीत शिकऱ्या मुलीला प्रपोज करून तिला एक लॉकेट आणि चेन दिली. अर्थातच जेव्हा सेशनच्या दरम्यान त्यामागचं कारण कौस्तुभने सांगितलं ते होतं पीअर प्रेशरचं. त्याच्या क्लासमधल्या मुलांनी त्याला गर्लफ्रेंड नसल्याबद्दल खूप प्रेशराईज केलं होतं. त्याने मग इतरांकडून माहिती मिळवून रियासाठी पहिल्यांदा गिफ्ट घेतलं आणि तिला फ्रेंडशिप ऑफर केली. साहजिकच तिने प्रिन्सिपलकडे कंप्लेंट केली आणि पॅरेन्टसना तर धक्काच बसला की आपला मुलगा अजून धड मोठा झाला नाही आणि तो गर्लफ्रेंड मिळवण्यासाठी असं का वागतो? पण सेशनमध्ये तो म्हणाला की 'मॅम मला फ्रेंडस म्हणाले की तुला गर्लफ्रेंड नाही म्हणजे तुझ्यात काहीतरी प्रॉब्लेम आहे. तुला एक गर्लफ्रेंड पटवता येत नाही का?

मुलंमुली जसजशी मोठी होतात. त्यांच्या आयुष्यात मित्रमैत्रिणींच्या ग्रुपचं महत्व जास्त होत जातं. किंबहुना ते वाढत जातं.त्यामागे त्यांच्या विकसित होणाऱ्या व्यक्तिमत्त्वाला त्या गटात ॲप्रिसिएशन मिळणं ही त्यांची गरज असते. त्या गटात आपलं स्थान मिळवणं, ते टिकवणं, ग्रुपमध्ये सगळ्यांचं फेवरिट बनणं, फ्रेंडस ना आपण हवंहवंसं वाटणं त्यांना मनापासून आवडतं. खरं सांगा किंवा तुमच्या मनाला हा प्रश्न विचारा की हे हवंसं वाटणं हे आपल्याला या वयातही सुखावतं. त्यातून मनात निर्माण होतो आत्मविश्वास. अगदी तसंच मित्र हेच त्यांचं जग बनतं. त्यांना इतरांकडून ॲप्रिसिएशन मिळालं, मान्यता मिळाली की त्यांनाही अस्तित्वाची जाणीव होते.ते कॉन्फिडन्ट बनतात.आणि गटातल्या मित्रांच्या

म्हणण्यानुसार जर ते वागू शकले नाहीत, करु शकले नाहीत तर ते नाकारले जातात, डावलले जातात. मग या पीअर प्रेशरमुळे मुलं स्वतःला असुरक्षित समजायला लागतात. त्यांची मतं,विचार, आवडीनिवडी, सवयी आपल्या ग्रुपनुसार बदलण्याचा आटोकाट प्रयत्न करतात. त्यांच्यासारखं बनू पाहतात कारण त्यांना ग्रुपमध्ये टिकायचं असतं. हे प्रेशर वेगवेगळ्या फॉर्ममध्ये असतं आणि ते मुलांवर वेगवेगळा परिणाम करतं.पीअर प्रेशरचे भिन्न भिन्न प्रकार असतात.

- **स्पोकन प्रेशर**

या प्रकारात मुलांना काही करायला सांगितलं जातं,काही सुचवलं जातं, परस्यु केलं जातं, अमूक गोष्ट तुला करावीच लागेल असं म्हणून कधीकधी तर सरळ सरळ तसं प्रेशराईज केलं जातं. हे बोलून आणलं जाणारं स्पोकन प्रेशर असतं. उदाहरणार्थ मुलींना मुलांशी किंवा मुलांना मुलांकडून एखादं चॅलेंज घ्यायला सांगणं, शिक्षकांना प्रॅन्क करणं. घरच्यांना त्रास होईल असं काही विचित्र वागणं.

- **अनस्पोकन प्रेशर**

या प्रकारच्या पीअर प्रेशर मध्ये ग्रुपप्रमाणे कपड्यांच्या, केसांच्या,ज्वेलरी, ॲक्सेसरी यांची फॅशन मुलांना ॲडॉप्ट करण्याचं प्रेशर असतं. मुलांनी त्या ग्रुपमध्ये जॉईन होणं, पर्सनल इंटरॲक्शन होणं याबाबत ही मुलांना त्या स्टाईल, ते मॅनरिझ्मस शिकण्याचंही त्यांच्यावर दडपण असतं.त्यांच्या टीम्स, क्लब यामध्ये स्थान मिळवणं हे त्यांच्याकरता चॅलेंज असतं. बऱ्याचदा यंग टीनएजर्समध्ये स्वतःच्या गरजा, लॉन्ग टर्म डिसीजन्स घेण्याबाबत त्यांची मेंटल मॅच्युरिटी कमी पडते. कारण मुलंवर पॉप्युलर मुलांचा त्यांच्यावर इनफ्लुएन्स असतो. हे असतं अनस्पोकन पीअर प्रेशर.

- **डायरेक्ट पीअर प्रेशर**

अशा पीअर प्रेशरमध्ये मुलांना ऑन द स्पॉट डिसीजन घ्यावा लागतो उदाः परीक्षेत दुस-याच्या पेपरमध्ये बघणं, कॉपीला विरोध न करणं, ड्रिंक घेण्याचा आग्रह खरं म्हणजे प्रेशर, सिगरेट ओढण्यासाठी जबरदस्ती,सेक्शुअल ॲक्टिव्हिटी करायला भाग पाडणे. यात बऱ्याचदा मुलं मनाने तयार नसताना ते प्रेशरला बळी पडतात.

- **इनडायरेक्ट पीअर प्रेशर**

हे प्रेशर असतं मोठ्या किंवा वेगवेगळ्या प्रकारचे अनुभव घेणाऱ्या एक्स्पिरियन्स मुलांचं पाहून तसंच वागण्याचा, करण्याचा प्रयत्न करणं. मोठ्या मुलीसारखीच भाईगिरी करणं, एक्स्पिरियन्स मुलांप्रमाणे लाडे लाडे बोलणं, वागणं.

- **निगेटिव्ह पीअर प्रेशर**

मुलांच्या घरातील नीतिमूल्ये, फॅमिली व्हॅल्यू, वागण्याबोलण्याचे संकेत यांच्या बरोबर विरुद्ध वागण्याचं हे पीअर प्रेशर असतं. आपलं मूल असं वागूच शकत नाही असं एकीकडे पालकांच्या मनाला वाटत असताना मुलं अशी वागतात हे पहावं लागणं यामागे असतं निगेटिव्ह पीअर प्रेशर. मुलं त्यांच्या ग्रुप लीडरची स्ट्राँग पर्सनॅलिटी, त्यांची गटातील पोझिशन यामुळे इम्प्रेस होतात आपणही तसंच स्ट्राँग पर्सनॅलिटी बनावं हे या वयातलं निगेटिव्ह असलं तरी ते प्रेशर असतं.मुलं अशावेळी त्यांच्या बिलीफ्सच्या अगेन्स्ट जाऊन स्वतःला ॲक्सेप्टन्स मिळवणं हे महत्वाचं समजतात.

## मुलांची संगत महत्वाची

**मुलं ज्या ग्रुपमध्ये असतात तो ग्रुप जर डायनॅमिक मुलं चालवत असतील आणि त्यांचे विचार, वागणं जर हेल्दी, वयाला साजेसं, आणि समाजमान्य असतील तर मुलांवर त्याचा पॉझिटिव्ह परिणाम होतो. म्हणजेच जर ग्रुपमधील मुलांना अभ्यासात चांगल्या ग्रेड मिळवायच्या असतील तर त्या मुलांच्या प्रभावाने ते चांगला अभ्यास करतात. किंवा जर त्या ग्रुपमधील मुलांपैकी काहीजण आवडत्या वस्तू विकत घेण्यासाठी सेव्हिंग्ज करतात आणि ते पाहून बाकीची मुलं देखील तसा विचार करतात. सेव्हिंग्ज करण्याचं अनुकरण करतात. व्यसनांपासून कायम दूर राहण्याची शपथ जर ग्रुपने घेतली तर तुमचं मूलही अशा पॉझिटिव्ह पीअर प्रेशरने केवळ अभ्यासातच नाहीतर लाईफस्किल्स मध्येही प्रगती करतात. म्हणूनच लहानपणापासून आई-वडील आपलं मूल कोणत्या मुलांबरोबर राहतं, खेळतं यावर लक्ष ठेवून असतात. थोडक्यात मुलांची संगत महत्वाची असते.**

# तणनाशकाचा योग्य वापर, ऊस उत्पादनाची गुरुकिल्ली




**ऊस हे महाराष्ट्रातील महत्त्वाचे नगदी पीक आहे. भरघोस उत्पादन मिळविण्यासाठी योग्य वाण, संतुलित खत व्यवस्थापन, वेळेवर पाणी आणि तणांचे प्रभावी नियंत्रण या चार बाबी अत्यंत महत्त्वाच्या आहेत. त्यापैकी तणनियंत्रणाकडे अनेकदा दुर्लक्ष होते. परिणामी उसाच्या सुरुवातीच्या वाढीवर विपरीत परिणाम होतो आणि उत्पादनात घट येते.**

**दिलीप पार्लेकर,** शेती अधिकारी, क्रांती साखर कारखाना, कुंडल

ऊस लागवडीनंतर पहिल्या ६० ते ९० दिवसांचा कालावधी हा तणनियंत्रणाच्या दृष्टीने महत्त्वाचा असतो. या काळात तणांची वाढ वेगाने होते. ही तणे उसाबरोबरच अन्नद्रव्ये, पाणी, सूर्यप्रकाश आणि जमिनीतील ओलावा यासाठी स्पर्धा करतात. त्यामुळे उसाची वाढ खुंटते, फुटवे कमी येतात आणि उत्पादनावर परिणाम होतो. काही तणे रोग व किडींचे आश्रयस्थानही बनतात. मजुरांची कमतरता आणि वाढता मजुरी खर्च लक्षात घेता अनेक शेतकरी तणनाशकांचा वापर करून प्रभावी तणनियंत्रण करत आहेत. मात्र तणनाशकाचा योग्य वेळ, योग्य पद्धत आणि शिफारशीनुसार वापर केल्यासच अपेक्षित परिणाम मिळतात.

**लागवडीनंतर तणनाशकाची फवारणी**

उसाची लागवड झाल्यानंतर जमीन चांगली ओलसर असताना तणनाशकाची फवारणी केल्यास त्याचा अधिक चांगला परिणाम दिसून येतो. त्यामुळे लागवडीनंतर दोन ते तीन दिवसांच्या आत, जमिनीत पुरेशी ओल असताना फवारणी करावी. तणनाशक फवारणी करण्यापूर्वी उघड्या राहिलेल्या उसाच्या कांड्या मातीने झाकून घ्याव्यात. त्यानंतरच फवारणी करावी. त्यामुळे तणनाशकाचा थेट संपर्क उसाच्या कांड्यांशी येत नाही आणि उगवण सुरक्षित राहते. जर लागवडीच्या वेळी दोन ते तीन पानांच्या अवस्थेतील तणे दिसत असतील, संबंधित तणनाशकांचा एकत्रित वापर करता येतो. मात्र कोणतेही तणनाशक वापरण्यापूर्वी त्यावरील लेबलवरील सूचना किंवा स्थानिक कृषी तज्ज्ञांचा सल्ला घेणे आवश्यक आहे.

**फवारणीची योग्य पद्धतही तितकीच महत्त्वाची**

तणनाशकाची फवारणी करताना अनेक शेतकरी पुढे चालत फवारणी करतात. त्यामुळे फवारणी झालेल्या जमिनीवर पाय पडून औषधाचे संरक्षणात्मक आवरण तुटते.

## सुरक्षित फवारणीही तितकीच आवश्यक

- हातमोजे, मास्क, गॉगल आणि बूट वापरावेत.
- जोरदार वारा असताना फवारणी टाळा.
- पावसाची शक्यता असल्यास फवारणी करू नये.
- फवारणीनंतर यंत्र स्वच्छ धुवून ठेवावे.
- रिकाम्या औषधाच्या बाटल्या किंवा पॅकेटची योग्य विल्हेवाट लावावी.
- तणनाशक मिसळताना किंवा फवारणी करताना अन्नपदार्थांचे सेवन टाळावे.
- प्रत्येक ऊस जातीची सहनशक्ती वेगळी असते.

## तणनियंत्रणासाठी १० नियम

- लागवडीनंतर जमिनीत ओल असतानाच तणनाशकाची फवारणी करा.
- फवारणीपूर्वी उघड्या पडलेल्या उसाच्या कांड्या मातीने झाकून घ्या.
- फवारणी करताना मागे (रिव्हर्स) सरकत फवारणी करा.
- तणांच्या प्रकारानुसार योग्य तणनाशकाची निवड करा.
- शिफारशीपेक्षा अधिक मात्रा कधीही वापरू नका.
- नवीन ऊस जातींमध्ये तणनाशक वापरण्यापूर्वी तज्ज्ञांचा सल्ला घ्या.
- फवारणीनंतर शेताची नियमित पाहणी करा.
- आवश्यकतेनुसार कमी मजुरांत खुरपणी करून तणांवर अंतिम नियंत्रण मिळवा.

त्या ठिकाणी नंतर तण पुन्हा उगवण्याची शक्यता वाढते. यासाठी फवारणी करताना मागे (रिव्हर्स) सरकत फवारणी करणे अधिक फायदेशीर ठरते. त्यामुळे जमिनीवर तयार झालेले औषधाचे आवरण कायम राहते आणि तणनाशकाची कार्यक्षमता वाढते.

### रोपलागवडीत तणनियंत्रण

रोपलागवड करताना शक्य असल्यास रोपे लावण्यापूर्वी पाणी देऊन ओल तयार करावी आणि त्यानंतर तणनाशकाची फवारणी करावी. जर हे शक्य झाले नाही, तर रोपे लावल्यानंतर तणांच्या अवस्थेनुसार योग्य तणनियंत्रण करावे. तणांची वाढ, त्यांचा प्रकार आणि उसाची अवस्था लक्षात घेऊनच तणनाशकांचा वापर करावा. विशेषतः गवतवर्गीय तणांचे प्रमाण जास्त असल्यास त्यानुसार योग्य उपाययोजना करणे आवश्यक असते.

### तणनियंत्रणाचे फायदे

सुरुवातीच्या काळात प्रभावी तणनियंत्रण झाल्यास साधारणतः एक महिना तणांचा त्रास कमी होतो. त्यामुळे उसाची वाढ जोमाने होते. त्यानंतर थोड्याफार प्रमाणात गवतवर्गीय तणे दिसू शकतात. अशा वेळी कमी मजुरांत खुरपणी करून तणांवर नियंत्रण मिळविता येते. आजच्या परिस्थितीत मजुरांची उपलब्धता कमी असून मजुरीचे दर वाढले आहेत. त्यामुळे योग्य तणनाशक व्यवस्थापनामुळे खुरपणीचा खर्च मोठ्या प्रमाणात कमी होतो. परिणामी उत्पादन खर्चात बचत होऊन शेती अधिक फायदेशीर ठरते.

### वापरताना घ्या विशेष काळजी

तणनाशकांचा वापर करताना योग्य प्रमाण, योग्य वेळ आणि योग्य पद्धत या तीन बाबी अत्यंत महत्त्वाच्या आहेत. अनेक वेळा शिफारशीपेक्षा अधिक मात्रा वापरल्यास तण लवकर नष्ट होतील, असा गैरसमज काही शेतकऱ्यांमध्ये असतो. प्रत्यक्षात मात्र अधिक तीव्रतेने फवारणी केल्यास उसाच्या पिकावर विपरीत परिणाम होऊ शकतो. उगवण झाल्यानंतर किंवा रोपलागवडीनंतर तणनाशक वापरण्याची गरज भासल्यास फवारणी शिफारशीनुसारच करावी. जास्त प्रमाणात तणनाशक वापरल्यास उसाच्या पानांवर स्कॉर्चिंग (करपणे) येण्याची शक्यता असते. तसेच पिकावर अनावश्यक ताण येऊन वाढ खुंटू शकते. त्यामुळे ‘जास्त औषध म्हणजे जास्त परिणाम’ हा समज पूर्णपणे चुकीचा आहे.

### तणांच्या अवस्थेनुसार तणनियंत्रण करा

तणनियंत्रण करताना तणांचा प्रकार ओळखणे महत्त्वाचे आहे. रुंद पानांची तणे आणि गवतवर्गीय तणे यांच्यासाठी वेगवेगळ्या प्रकारच्या तणनाशकांची आवश्यकता असते. त्यामुळे तणांची अवस्था आणि प्रकार लक्षात घेऊनच तणनाशकांची निवड करावी.

# फवारणीमुळे वाढेल भूईमुगाचे उत्पन्न

**भूईमूग हे कमी खर्चात चांगला आर्थिक परतावा देणारे महत्त्वाचे तेलबिया पीक आहे. मात्र अनेक शेतकऱ्यांना अपेक्षित उत्पादन मिळत नाही. यामागील प्रमुख कारणे म्हणजे असंतुलित खत व्यवस्थापन, सूक्ष्म अन्नद्रव्यांची कमतरता, वेळेवर कीड-रोग नियंत्रण न करणे आणि फुलोऱ्यापासून शेंगा भरण्याच्या अवस्थेत योग्य पीक व्यवस्थापनाचा अभाव. त्यामुळे भूईमुगाचे उत्पादन वाढविण्यासाठी शास्त्रशुद्ध पद्धतीने खतांचा वापर आणि योग्य वेळी आवश्यक फवारण्या करणे गरजेचे आहे.**





**प्रतापसिंह मोहिते-पाटील,**
कृषी संशोधक, सांगली


भूईमूग लागवडीपूर्वी जमिनीची तपासणी करूनच खतांचा वापर करावा. जमिनीत भरपूर सेंद्रिय कर्ब असल्यास पिकाची वाढ चांगली होते. त्यामुळे शेवटच्या कुळवणीवेळी प्रति एकर २ ते ३ टन चांगले कुजलेले शेणखत किंवा कंपोस्ट मिसळावे. यामुळे जमिनीची भुसभुशीतता वाढते, पाणी धारण करण्याची क्षमता सुधारते आणि सूक्ष्मजीवांची वाढ होते.

### रासायनिक खतांचा संतुलित वापर

जमिनीच्या तपासणीनुसार खतांचा वापर करणे सर्वोत्तम असले तरी सर्वसाधारणपणे प्रति एकर ५० किलो सिंगल सुपर फॉस्फेट (एसएसपी) आणि १० ते १५ किलो युरिया पेरणीवेळी देणे फायदेशीर ठरते. सिंगल सुपर फॉस्फेटमधून स्फुरदाबरोबरच गंधक आणि कॅल्शियमही मिळते. ही दोन्ही अन्नद्रव्ये शेंगा भरण्यासाठी अत्यंत महत्त्वाची आहेत भूईमुगात जास्त नत्राची गरज नसते. कारण रायझोबियम जीवाणू मुळांवरील गाठींद्वारे नत्र स्थिरीकरण करतात. त्यामुळे बियाण्याला रायझोबियम आणि पीएसबी (फॉस्फेट विद्रावक जीवाणू) यांची प्रक्रिया केल्यास खतांची कार्यक्षमता वाढते.

### जिप्समचा वापर उत्पादन वाढवितो

फुलोऱ्याच्या सुरुवातीच्या अवस्थेत प्रतिएकर ७५ ते १०० किलो जिप्सम दिल्यास कॅल्शियम आणि गंधकाचा पुरवठा होतो. यामुळे शेंगांची संख्या, दाण्यांचा आकार आणि वजन वाढण्यास मदत होते. अनेक संशोधनांमध्ये जिप्समच्या वापरामुळे उत्पादनात लक्षणीय वाढ झाल्याचे आढळून आले आहे.

### सूक्ष्म अन्नद्रव्यांची कमतरता भरून काढा

जस्त, बोरॉन, लोह किंवा मॅग्नेशियम यांसारख्या सूक्ष्म अन्नद्रव्यांची कमतरता असल्यास पिकाची वाढ मंदावते. त्यामुळे जमिनीच्या तपासणी अहवालानुसार किंवा कृषी तज्ज्ञांच्या मार्गदर्शनानुसार सूक्ष्म अन्नद्रव्यांचा वापर करावा.

### विद्राव्य खतांची फवारणी

फुलोऱ्यापासून शेंगा भरण्याच्या काळात विद्राव्य खतांच्या दोन फवारण्या घेतल्यास दाणे भरण्यास मदत होते. या अवस्थेत १९:१९:१९ किंवा १३:०:४५ यांसारख्या विद्राव्य

खतांचा शिफारशीनुसार वापर केल्यास पिकाची वाढ आणि उत्पादन सुधारते.

### पिकाच्या वाढीसाठी जैव-उत्तेजकांचा वापर

फुलोऱ्यानंतर समुद्री शेवाळावर आधारित जैव-उत्तेजके (सी-वीड एक्स्ट्रॅक्ट), अमिनो ॲसिड किंवा ह्युमिक-फुल्विक ॲसिडयुक्त उत्पादने कृषी तज्ज्ञांच्या सल्ल्याने वापरल्यास मुळांची वाढ, फुलधारणा आणि शेंगा भरण्यास मदत होऊ शकते.

### कीड-रोगांचे वेळेवर नियंत्रण

भूईमुगात तुडतुडे, मावा, पाने खाणाऱ्या अळ्या आणि फुलकिडी यांचा प्रादुर्भाव होऊ शकतो. तसेच टिक्का (पानावरील ठिपके) आणि गंज हे प्रमुख रोग आहेत. त्यामुळे दर आठवड्याला पिकाची पाहणी करावी. प्रादुर्भाव आढळल्यास कृषी विभाग किंवा कृषी विद्यापीठाच्या शिफारशीनुसार योग्य कीटकनाशक किंवा बुरशीनाशकाची फवारणी करावी. अनावश्यक आणि वारंवार फवारण्या टाळाव्यात.

### पाणी व्यवस्थापनही महत्त्वाचे

फुलोरा, पेग (आरी) जमिनीत जाण्याचा काळ आणि शेंगा भरण्याची अवस्था या टप्प्यांवर पाण्याचा ताण पडू देऊ नये. त्याचवेळी शेतात पाणी साचणार नाही, याचीही काळजी घ्यावी.

### उत्पादन वाढीसाठी 'पंचसूत्री'

भूईमुगाचे भरघोस उत्पादन मिळविण्यासाठी पाच बाबी महत्त्वाच्या आहेत-योग्य वाण, संतुलित खत व्यवस्थापन, जिप्समचा वापर, वेळेवर कीड-रोग नियंत्रण आणि योग्य पाणी व्यवस्थापन. या सर्व बाबींचे काटेकोर पालन केल्यास भूईमुगाचे उत्पादन आणि दर्जा दोन्ही वाढून शेतकऱ्यांच्या उत्पन्नात निश्चितच वाढ होऊ शकते.






# ‘वीज बिले माफ केली तरच पाणी योजना वाचतील’

## सांगलीत महावितरणच्या दारात शेतकऱ्यांचा आक्रोश ; वीजपुरवठा, सिंचन आणि आरडीएसएसच्या कामांवर उत्तरांची आ. लाड यांची मागणी



***सांगली : विविध मागण्यांसाठी अरुणअण्णा लाड, शरद लाड यांच्या नेतृत्वाखाली महावितरण कार्यालयावर मोर्चा काढून मागण्यांचे निवेदन महावितरणच्या अधिकाऱ्यांना देण्यात आले.***

**सांगली : क्रांतिअग्रणी वृत्तसेवा**

जिल्ह्यातील वीज वितरण व्यवस्थेविरोधातील शेतकऱ्यांचा वाढता असंतोष अखेर रस्त्यावर उतरला. वारंवार होणारे लोडशेडिंग, कमी-जास्त दाबाचा वीजपुरवठा, जीर्ण झालेली वीज वितरण यंत्रणा, लिफ्ट इरिगेशन योजनांना भेडसावणाऱ्या अडचणी आणि आरडीएसएस योजनेंतर्गत सुरू असलेल्या कामांबाबत पारदर्शकतेची मागणी यासाठी महाराष्ट्र राज्य इरिगेशन फेडरेशनचे अध्यक्ष तथा आमदार अरुण लाड व क्रांती साखर कारखान्याचे अध्यक्ष शरद लाड यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांनी महावितरणच्या विश्रामबाग (सांगली) येथील अधीक्षक अभियंता कार्यालयावर मोर्चा काढला.

हा मोर्चा केवळ निवेदन देण्यापुरता मर्यादित नव्हता; तर जिल्ह्यातील वीज व्यवस्थेतील त्रुटींविरोधातील सामूहिक संतापाची अभिव्यक्ती ठरला. शेतकऱ्यांनी विविध मागण्यांचे निवेदन सादर करून महावितरण प्रशासनाकडून ठोस आणि कालबद्ध उपाययोजनांची मागणी केली.

या वेळी आमदार लाड म्हणाले, वीज हा शेतीचा कणा आहे. विशेषतः लिफ्ट इरिगेशन योजनांवर अवलंबून असलेल्या सांगली, सातारा, कोल्हापूर जिल्ह्यातील अनेक भागांमध्ये शेतीचे संपूर्ण गणितच वीजपुरवठ्यावर अवलंबून आहे. मात्र अनियमित वीज, कमी-जास्त दाब आणि वारंवार

## मोर्चातील प्रमुख मागण्या

- जीर्ण व धोकादायक वीज वितरण यंत्रणेची तातडीने दुरुस्ती करावी
- वारंवार होणारे लोडशेडिंग आणि कमी-जास्त दाबाचा वीजपुरवठा बंद करणे
- लिफ्ट इरिगेशन योजनांना अखंडित वीजपुरवठा करणे
- ट्रान्सफॉर्मर जळणे आणि वीज खंडित होण्यावर कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात
- शॉर्टसर्किटमुळे पिकांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना भरपाई देणे
- आरडीएसएसअंतर्गत मंजूर १४७.६८ कोटी रुपयांच्या कामांचा तालुकानिहाय हिशेब जाहीर करणे.
- सहकारी पाणीपुरवठा व सिंचन योजनांची वीज बिल थकबाकी माफ करणे.
- सर्व प्रलंबित कामांसाठी कालबद्ध कृती आराखडा जाहीर करणे.



*» शेतकऱ्यांना अखंडित, दर्जेदार आणि सुरक्षित वीजपुरवठा मिळणे हा अधिकार आहे; त्यामुळे आश्वासनांपेक्षा कृती महत्त्वाची आहे.*

*-आमदार अरुण लाड*



*» सहकारी तत्त्वावरील सिंचन योजनांची वीज बिल थकबाकी माफ करण्याची गरज आहे. यासाठी शासन दरबारी पाठपुरावा करण्यात येईल.*

*- शरद लाड, अध्यक्ष, क्रांती कारखाना, कुंडल*

होणारे तांत्रिक बिघाड यामुळे सिंचन व्यवस्थेचा खोळंबा होत आहे. वेळेवर पाणी न मिळाल्याने पिकांचे नुकसान वाढत असल्याने त्याचा थेट आर्थिक फटका शेतकऱ्यांना बसत आहे.

त्यांनी पुढे सांगितले की, जिल्ह्यातील अनेक गावांमध्ये वीज वितरण यंत्रणा धोकादायक अवस्थेत पोहोचली आहे. गंजलेले व झुकलेले वीज खांब, उघडे डीपी, झाडांच्या फांद्यांतून गेलेल्या वाहिन्या आणि लटकणाऱ्या तारांमुळे अपघाताचा धोका वाढला आहे. पावसाळ्यात ही परिस्थिती अधिक गंभीर बनते. शॉर्टसर्किटमुळे उभ्या पिकांना आग लागल्याच्या घटनाही घडत असल्याने हा प्रश्न केवळ वीजपुरवठ्याचा नसून सार्वजनिक सुरक्षेचाही बनला आहे.

क्रांती साखर कारखान्याचे चेअरमन शरद लाड यांनी केंद्र शासनाच्या आरडीएसएसअंतर्गत सांगली जिल्ह्यास मंजूर झालेल्या १४७.६८ कोटी रुपयांच्या कामांचाही मुद्दा उपस्थित केला. या निधीतून तालुकानिहाय कोणती कामे पूर्ण झाली, किती कामे प्रलंबित आहेत आणि उर्वरित कामे कधी पूर्ण होणार, याचा हिशोब जाहीर करण्याची मागणी त्यांनी केली. लिफ्ट इरिगेशन योजनांना कमी दाबाचा वीजपुरवठा, वारंवार जळणारे ट्रान्सफॉर्मर आणि खंडित वीजपुरवठ्यामुळे पाणीपुरवठा व्यवस्था विस्कळीत होत आहे. याची देखभाल नियमित करावी. ऊस, भाजीपाला, फळबागा आणि इतर सिंचनाधारित पिकांचे मोठे नुकसान होत असल्याचे लाड यांनी यावेळी सांगितले. या नुकसानीची भरपाई देण्याची मागणीही करण्यात आली.

या आंदोलनाचे वैशिष्ट्य म्हणजे हा केवळ एका गावाचा किंवा एका भागाचा प्रश्न नव्हता. सांगली, सातारा, कोल्हापूर जिल्ह्यातील विविध भागांतील शेतकरी, नागरिक आणि विविध संघटनांचे प्रतिनिधी या मोर्चात सहभागी झाले. मोर्चादरम्यान महावितरणच्या अधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. विविध मागण्यांवर सकारात्मक निर्णय घेण्याबरोबरच कालबद्ध कृती आराखडा जाहीर करण्याची मागणी करण्यात आली. प्रशासनानेही शेतकऱ्यांच्या मागण्यांची दखल घेऊन आवश्यक कार्यवाही करण्याचे आश्वासन दिल्याचे आंदोलनकर्त्यांनी सांगितले.

# Made In India
# भारतातील सर्वात जुन्या 10 कंपन्या

| स्थापना वर्ष | | कंपनीचे नाव | एकूण मूल्य (कोटी रुपयांमध्ये) | मुख्यालय |
|---|---|---|---|---|
| 1838 | THE TIMES GROUP | बेनेट, कोलमन कंपनी (टाइम्स ग्रुप) | ₹13,420 | मुंबई |
| 1863 | BB SINCE 1863 | बॉम्बे बर्मा ट्रेडिंग कॉर्पोरेशन | ₹10,480 | मुंबई |
| 1875 | BSE The Power of Vibrance | BSE | ₹1,48,490 | मुंबई |
| 1884 | Dabur | डाबर इंडिया | ₹78,310 | गाझियाबाद |
| 1887 | Muthoot FINCORP | मुथूट फिनकॉर्प | ₹26,180 | तिरुवनंतपुरम |
| 1888 | Kirloskar Since 1888 | किर्लोस्कर ब्रदर्स | ₹13,740 | पुणे |
| 1892 | BRITANNIA Eat Healthy, Think Better | ब्रिटानिया इंडस्ट्रीज | ₹1,37,930 | बंगळुरू |
| 1897 | Godrej | गोदरेज इंडस्ट्रीज | ₹32,310 | मुंबई |
| 1897 | ADITYA BIRLA REAL ESTATE | आदित्य बिर्ला रिअल इस्टेट | ₹16,610 | मुंबई |
| 1899 | IHCL THE INDIAN HOTELS COMPANY LIMITED | IHCL | ₹90,510 | मुंबई |
| 1899 | CESC LIMITED | CESC | ₹24,860 | कोलकाता |


पत्रव्यवहाराचा पत्ता : संपादक, **'क्रांतिअग्रणी पर्व'** पाक्षिक, मु.पो. कुंडल - 416 309. ता. पलूस, जि. सांगली (महाराष्ट्र)

हे पाक्षिक संपादक चंद्रकांत लक्ष्मण रोकडे, प्रकाशक उमेश दत्तात्रय पेटकर, मालक अशोक पांडूरंग पवार यांनी मुद्रक लक्ष्मी प्रिंटिंग प्रेस, कुंडल यांचेकडे छापून कुंडल ता. पलूस, जि. सांगली येथून प्रसिध्द केले.

RNI No.: MAHMAR/2008/24954
RND/53/KRANTIAGRANIPARV/2025
SGL/53/2025-2027